कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

## शालेय स्पर्धेदरम्यान विद्यार्थिनीचा मृत्यू

**महाड :** कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आंतरशालेय स्पर्धेसाठी अलिबाग येथून आलेल्या नववीतील निधी म्हात्रे या विद्यार्थिनीचा कार्यक्रमादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना महाड येथे घडली. या घटनेमुळे विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये शोकाकूल वातावरण पसरले असून मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मृत पावलेल्या विद्यार्थिनीचे नाव निधी समीर म्हात्रे असे असून ती कोकण एज्युकेशन सोसायटीच्या अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील शाळेत नववीमध्ये शिकत होती.

पान २ वर

## चिमुकल्याला नेलं बिबट्यानं उचलून

**संगमनेर :** अहिल्यानगरमधील संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग गावात शनिवारी सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास दुर्दैवी घटना घडली. घराच्या दारात उभा असलेल्या चार वर्षीय सिद्धेश कडलग या चिमुकल्यावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला केला. बालकाला जागेवरच उचलून ठार केले. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. बिबट्याला ठार मारल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका कुटुंबियांनी घेतली होती.

# विरोधकांना धडा शिकविणार

### शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

आपटवणे ग्रामपंचायतीमधील कामे ही शेकापच्या माध्यमातून करण्यात आली आहेत. या गावचा रस्ता प्रधानमंत्री सडक योजनेतून करण्यासाठी पाठपुरावा केला होता. या गावाची सरपंच कर्तबगार आहे. या तालुक्यातील महिला नेहमी पक्षाच्या कामात आघाडीवर असतात. मी या ठिकाणी आपटवणे येथील निष्ठावंत कार्यकर्त्यांसाठी आलो आहे. युती आघाडी कोणाची होईल ते माहीत नाही; पण शेतकरी कामगार पक्षाशिवाय जिल्हा परिषद येणार नाही. या मतदारसंघात आजपर्यंत शेकापच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांने उमेदवाराला निवडून देण्याचा इतिहास केला आहे.यामुळे शेकाप संपला असे बोलणाऱ्यांना शेकापच धडा शिकवेल, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.




**1** आपटवणे गाव हे राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या महत्वाचे आहे. या गावातील कार्यकर्ते हे शेकाप बरोबर निष्ठावंत आहेत. गावाच्या विकासासाठीच्या योजना शेकापने राबविल्या आहेत.

**2** या गावाच्या वतीने शेतकरी कामगार पक्षाला नेहमी मताधिक्य दिले आहे. येणाऱ्या निवडणुकीतदेखील मताधिक्य मिळेल, अशी ग्वाही सुरेश खैरे यांनी दिली.

**3** आपटवणे गावचा विकास शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून लोकनेते सुरेश खैरे यांनी केला आहे, असे आपटवणेच्या सरपंच अस्मिता बैकर यांनी सांगितले.

सुरेश खैरे यांच्या रूपाने शेकापला कार्यक्षम जिल्हा चिटणीस मिळाला. सुरेश खैरे यांचे कौतुक म्हणजे तालुक्यातील कार्यकर्त्यांचे कौतुक आहे. ज्या लोकांनी गद्दारी केली त्यांनाच विरोधकांनी जवळ केले. मात्र शेकाप हा निष्ठावंतांचा पक्ष आहे. मला तुमच्यासारखे निष्ठावंत कार्यकर्ते मिळाले की, मला तरुण झाल्यासारखे वाटते. मी या गावच्या विकासासाठी कटिबद्ध राहणार आहे. आपल्याला जिल्हा परिषद जिंकायची आहे. जो उमेदवार असेल त्याचे भवितव्य उज्वल असेल. जो पडत्या काळात आपल्याबरोबर आहे, त्यांना मी कधीच विसरत नाही. शेतकरी कामगार पक्षाच्या पूजेच्या कार्यक्रमाला बोलावले त्याबद्दल जिल्हा सरचिटणीस जयंत पाटील यांनी सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले. या पूजेनिमित्त गणेश

पान २ वर

## कामोठे सर्विस रोड महामार्गाला जोडा

### शेकापची पालिकेकडे मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामोठे परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी कामोठे बस स्टॉपजवळील सर्विस रस्ता सायन–पनवेल महामार्गाला जोडावा तसेच सेक्टर ६अ वेंकट हॉटेलजवळ ते जवाहर इंडस्ट्रीमार्गे कळंबोलीला जाणारा पूर्वीचा सेवा रस्ता तातडीने खुला करावा, अशी ठोस मागणी शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी केले आहे.त्यांनी या संदर्भात मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र दिले आहे.

एकमेव प्रवेशमार्गामुळे दररोज त्रास कामोठेमध्ये प्रवेशासाठी सध्या फक्त एकच एन्ट्री पॉईंट उपलब्ध असल्याने शाळेच्या बस, रुग्णवाहिका आणि रोजच्या वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेळ आणि इंधन वाया जाणे, आपत्कालीन सेवांना उशीर होणे अशा अनेक समस्या वाढल्या असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.कामोठे विकसित करताना सिडकोने एकच प्रवेशमार्ग ठेवला. नंतर पाठपुराव्यानंतर सिडकोकडून सदर क्षेत्र पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे रस्त्यांच्या विस्तार व दुरुस्तीची जबाबदारी आता महापालिकेवर आहे. सुमारे ५६ वर्षांपूर्वी हा सर्विस रस्ता वापरात होता. कोणतेही कारण न देता तो अचानक बंद करण्यात आला. यामुळे कळंबोलीहून येताना नागरिकांना महामार्गाचा धोकादायक पर्याय निवडावा लागत आहे. सायन–पनवेल महामार्गावर मागील काही वर्षांत ६२ अपघातांत २३ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे पर्यायी आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. दोन्ही सर्व्हिस रस्ते पनवेल महापालिकेच्या विकास आराखड्यात समाविष्ट असूनही त्यावर अंमलबजावणी झालेली नाही.

पान २ वर



कामोठे बस स्टॉपजवळील सर्विस रस्ता महामार्गाला तातडीने जोडावा, सेक्टर ६अ जवाहर इंडस्ट्री कळंबोली सर्विस रस्ता पुन्हा सुरु करावा, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, नागरिकांचे जीवन वाचवण्यासाठी कृती करावी, अशी मागणी केली आहे.

## वेधक

### अत्याचार करणारा १८ वर्षांनी जेरबंद

**पालघर :** २००७ मध्ये पालघर जिल्ह्यातील वसईमध्ये एक घटना घडली. त्यावेळी २२ वर्ष वय असलेल्या तरुणाने एका पाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केला. अत्याचारानंतर आरोपीने तिची हत्या केली. या घटनेनंतर आरोपी फरार झाला. पण, पोलिसांनी ठरवले, तर ते कुठून आरोपीला शोधून काढतात, त्याची प्रचिती या प्रकरणात आली आहे. पोलिसांनी १८ वर्षे चकमा देणाऱ्या या आरोपीला अटक केली. उत्तर प्रदेशात जाऊन त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या. आरोपीने पाच वर्षाच्या मुलीचे आरोपीने आधी अपहरण केले होते. तिच्यावर बलात्कार केला आणि नंतर तिची हत्या केली. नंदलाल उर्फ नंदू विश्वकर्मा असे

पान २ वर

### चिमुकलीवर अत्याचार करुन हत्या

**मावळ :** पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. फक्त पाच वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कार करून निर्घृण हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळं संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शनिवारी संध्याकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ही चिमुकली घरातून अचानक बेपत्ता झाली होती.मिळालेल्या माहितीनुसार, रात्री आई कामावरुन घरी आल्यानंतर मुलगी बेपत्ता असल्याचे तीच्या लक्षात आले. माहिती मिळताच पिंपरीचिंचवड पोलिसांनी तातडीने शोध मोहीम

पान २ वर

## नागावचे पर्यटन बहरले...



● मागच्या आठवड्यात अलिबाग तालुक्यातील पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या नागाव येथे बिबट्या आला होता. हा बिबट्या पकडला न गेल्याने येणाऱ्या पुढील दिवसात याचा परिणाम पर्यटन व्यवसायावर होईल, असे मत येथील स्थानिक व्यावसायिक व्यक्त करत होते. परंतु पर्यटकांनी हे मत खोटे ठरवीत येथील समुद्रकिनारी विकेण्डला भरपूर गर्दी केली होती. त्यामुळे येथील पर्यटन व्यावसायिक सुखवला आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

## राष्ट्रीय लोक अदालतीत १७,९२० प्रकरणांचा निपटारा



**। रायगड । प्रतिनिधी ।**

दाखलपूर्व व प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा तसेच वाद सामोपचाराने मिटावेत, या उद्देशाने जिल्ह्यात दि. १३ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये वादपूर्व व दाखल अशी एकूण १७ हजार ९२० प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून पक्षकारांना एकूण ६१ कोटी १३ लाख १९ हजार ३८५ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार संपूर्ण देशभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातही प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. सृष्टी निळकंठ यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीचे उद्घाटन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलींद साठ्ये यांच्या हस्ते द्रुकश्राव्य माध्यमातून करण्यात आले.

जिल्ह्यात आयोजित लोक अदालतीमध्ये एकूण ७३ हजार ६३३ वादपूर्व प्रकरणे व १३ हजार ८९९ प्रलंबित खटले अशी ८७ हजार ५३२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १२ हजार ७५१ वादपूर्व व ५ हजार १६९ प्रलंबित अशी एकूण १७ हजार ९२० प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले.

**मोटार अपघात प्रकरणांत ३ कोटी ८३ लाखांची भरपाई**

राष्ट्रीय लोक अदालतीदरम्यान जिल्ह्यातील एकूण ४४ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ३ कोटी ८३ लाख ८४ हजार ७२३ रुपये इतकी नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली.जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये एकूण २७ लोक अदालतीचे

पान २ वर

**लोक अदालतीत ११ जोडप्यांचा संसार जुळला**

लोक अदालतीत कौटुंबिक वादांमध्ये सामंजस्य घडून आल्याने जिल्ह्यातील ११ जोडप्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाला. यामध्ये कर्जत–२, पाली–२, रोहा–२, पेण–२, मुरुड–१ व अलिबाग–२ जोडप्यांचा समावेश आहे. प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश डॉ. सृष्टी निळकंठ यांनी मनोमिलन झालेल्या जोडप्यांचे अभिनंदन केले.

## १९ डिसेंबरला राजकीय भूकंप

- **भारताचा पंतप्रधान मराठी माणूस बनणार**
- **पृथ्वीराज चव्हाण यांचे भाकीत**

**। पिंपरी । प्रतिनिधी ।**

येत्या १९ डिसेंबरला देशात सर्वात मोठा राजकीय भूकंप होईल, भारताचा पंतप्रधान बदलेल अन मराठी माणूस पंतप्रधान होईल, ती व्यक्ती भाजपचीच असू शकते. असं भाकीत माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाणांनी केले.



पृथ्वीराज चव्हाणांनी हा दावा करताना जगात घडणाऱ्या घडामोडींचे संदर्भ दिलेत. अमेरिकेतील नव्या कायद्याचा ही दाखला चव्हाणांनी दिला.अमेरिकेतील एक व्यक्ती जो इस्त्राईलचा गुप्तहेर होता. त्याने अनेक दिग्गज व्यक्तींच्या बंगल्यात कॅमेरे लावून स्टिंग ऑपरेशन केलेत, आता लवकरचं तो अनेकांचा पर्दाफाश करणार आहे. त्यामुळं अमेरिकेत मोठा धुमाकूळ होणार आहे.

अमेरिका सरकार एक कायदा करुन येत्या १९ डिसेंबरला त्या दिग्गजांची नावं जाहीर करणार आहे. असा दावा चव्हाणांनी केला. आता यात कोणाकोणाची नावं आहेत? याची मला फारशी कल्पना नाही. असं म्हणत चव्हाणांनी अमेरिकेतल्या स्टिंग ऑपरेशनचे पडसाद भारतात उमटण्याची शक्यता वर्तवली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये जनगणमन या पुस्तकाच्या प्रकाशन केल्यानंतर चव्हाणांनी भारतात १९ डिसेंबरला राजकीय भूकंप होण्याचं भाकीत केल आहे.

## वांजळे बोगद्याचे काम अंतिम टप्प्यात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत–पनवेल रेल्वे मार्ग नव्याने बांधला जात आहे.या मार्गावर कर्जत तालुक्यात दोन बोगदे असून त्यातील किरवली गावाजवळ असलेला ३०० मीटर लांबीचा वांजळे गाव येथील बोगदा अंतिम टप्प्यात आहे.या बोगद्याचे काम अंतिम टप्प्यात असून केवळ रूळ टाकण्याची कामे शिल्लक असल्याने लवकरच या मार्गावरून उपनगरीय लोकल ट्रेन सुरु होण्याची शक्यता वाढली आहे.

२००५ मध्ये बांधण्यात आलेल्या पनवेल कर्जत या एकेरी रेल्वे मार्गाच्या हलीवली येथील बोगद्याचा भाग ठिसूळ दगडाचा असल्याने मोठ्या प्रमाणात दगड कोसळत असतात. त्या दगडांनी अनेकांचे जीव गेले असून हा मार्ग उपनगरीय लोकलसाठी फेल गेल्याने मध्य रेल्वे प्रशासनाने पनवेल कर्जत असा नवीन रेल्वे मार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला. चौक पासून कर्जत असा पूर्णपणे नवीन तर पनवेल ते चौक स्टेशन असा जुन्या मार्गावर हा प्रकल्प आधारित आहे.




या मार्गावर कर्जत तालुक्यात किरवली वांजळे गावाच्या हद्दीत एक बोगदा खोदण्यात आला आहे. दुहेरी मार्गिका टाकण्यासाठी हा मार्ग बांधला जात असल्याने मध्य रेल्वे कडून प्रशस्त जागा ठेवून बोगदा बनवण्यात आला आहे.या ३०० मीटर लांबीच्या बोगद्याचे एक टोक किरवली गावाच्या हद्दीत तर दुसरे टोक हे वांजळे गावाच्या हद्दीत निघते.

या बोगद्या तीन येणारी मार्गिका वगळता अन्य सर्व कामे पूर्ण झाली असून हा बोगदा सोडल्यानंतर कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्ता आहे.त्या रस्त्याला उड्डाण पूल देखील बांधून पूर्ण आहे आणि त्यामुळे या नवीन बोगद्यामुळे कोणताही अडथळा रस्ते मार्गाला राहिला नाही.कर्जत पनवेल रेल्वे मार्गावरील या नवीन बोगद्याचे काम पूर्ण झालेले असल्याने या मार्गावर उपनगरीय रेल्वे वाहतूक सुरू करण्याच्या मार्गातील अडथळे कमी झाले आहेत.

**पाऊस लांबल्याने १५ दिवस उशीर ▌शेतकऱ्यांच्या हाताला मिळाले काम**

# शेतांमध्ये पांढरा कांदा लागवडीचा मोसम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून पांढऱ्या कांद्याच्या लागवडीला उत्साहाने सुरुवात झाली आहे. यामुळे परिसरातील अनेकांच्या हाताला काम मिळाले आहे, मात्र यंदा पावसाने अधिक काळ मुक्काम केल्यामुळे कांद्याची लागवड सुमारे १५ दिवस लांबणीवर गेली आहे. लागवडीची कामे सुरू झाल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी सध्या या कामात पूर्णपणे मग्न झाले आहेत. अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला त्याच्या चविष्टपणा आणि औषधी गुणधर्मांमुळे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून आणि राज्यांतून मागणी असते. अलिबाग तालुक्यातील कार्ले गावातील कांद्याला विशेष पसंती असून, येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या कांद्याचे उत्पादन घेतात. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरातील कांद्याला पर्यटक आणि स्थानिक लोकांकडून मोठी मागणी आहे.

चोंढी, कार्ले, खंडाळे, नेहुली, वाडगांव, मुळे, खानाव, उसर आदी परिसरातील गावांमध्ये शेतकरी पांढऱ्या कांद्याचे उत्पादन घेतात, ज्यामुळे त्यांना चांगले उत्पन्न मिळते.साधारणपणे भातकापणीची कामे संपल्यावर नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कांदा लागवडीला सुरुवात होते. यंदा जिल्ह्यात पाऊस जास्त

पान २ वर



> कांदा लागवड यंदा १५ दिवस उशिरा सुरू झाली आहे. लागवडीला सुरुवात झाली आहे. शेतकरी लागवडीच्या कामाला लागला आहे. कांदा लागवडीसाठी पोषक वातावरण आहे. कार्लेसह आजूबाजूच्या गावातील असंख्य शेतकरी भातशेतीसह पांढऱ्या कांद्याची लागवड करतात. कांदा लागवडीतून शेतकऱ्यांना उत्पन्नाचे साधन मिळत आहे. अलिबागमधील पांढरा कांदा चविष्ट व आरोग्यवर्धक आहे. त्यामुळे या कांद्याला मागणी प्रचंड आहे
> – सतिश म्हात्रे, कांदा उत्पादक शेतकरी.

**महिलांना मिळणार रोजगार**

कांदा लागवडीच्या या कामातून करोडो रुपयांची उलाढाल होते. अंदाजानुसार, जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत कांदा तयार होण्याची शक्यता आहे. या काळात कांदा काढणे, तसेच त्याच्या माळा तयार करणे आदी कामे मोठ्या प्रमाणावर चालणार आहेत. यामुळे परिसरातील महिलांना मोठा रोजगार उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

**नेरळमध्ये माणुसकीचे दर्शन**

## मुस्लिम तरुणाची अपघातग्रस्त कॉलेज तरुणीला वैद्यकीय मदत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात नेरळ भागात मुस्लिम आणि हिंदू धर्मीय यांच्यातील वातावरण काही प्रकरणामुळे दूषित झाले आहे.मात्र आपल्या समोर महाविद्यालयीन तरुणीला धडक देऊन दुचाकी चालक गायब झाला, परंतु एक तरुणी रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. त्या ठिकाणी असलेले मुस्लिम तरुण साकिब पोंजेकर यांनी केवळ आठ मिनिटात त्या तरुणीला रुग्णालयात पोहचवले. दरम्यान प्रथम नेरळ आणि नंतर बदलापूर येथे उपचार घेऊन ही कॉलेज तरुणी आता सुखरूप आपल्या घरी पोहचली आहे.



मागील काही महिन्यात नेरळ, ममदापूर, भडवल, दामत आणि शेलू परिसर हिंदू मुस्लिम धर्मीय यांच्यात किरकोळ कारणाने वाद होत होते. मात्र मागील दोन महिन्यात ही परिस्थिती काहीशी सुधारली आहे. त्यात नेरळ पोलीस ठाण्याची महत्वाची भूमिका असून मुस्लिम तरुणाच्या माणुसकीच्या कार्यामुळे हिंदू मुस्लिम

पान २ वर

## १००० कोटींच्या सायबर फ्रॉड रॅकेटचा भांडाफोड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑनलाइन गुंतवणूक, कर्ज आणि नोकरीचे आमिष दाखवून देशभरातील हजारो नागरिकांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या आणि संघटित सायबर फ्रॉड नेटवर्कचा केंद्रीय तपास ब्यूरोने पर्दाफाश केला आहे. या नेटवर्कच्या माध्यमातून देश–विदेशात १००० कोटींपेक्षा अधिक रकमेची हेराफेरी झाल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणात केंद्रीय तपास ब्यूरोने १७ आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले असून, त्यात ४ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. तसेच ५८ कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. सीबीआयच्या

पान २ वर

# रो-रोसाठी कोट्यवधींचा हट्ट

## सरकारकडून आर्थिक मदतीचा प्रयोग

। मुंबई । प्रतिनिधी ।

गणेशोत्सव, दसरा, दिवाळी संपूनही मुंबई ते कोकण रो-रो बोटसेवा अद्याप सुरू झालेली नाही. प्रवासी तिकीट दर आणि प्रचंड इंधनखर्च यांचा ताळमेळ जुळत नसल्याने ही सेवा व्यावसायिकदृष्ट्या परवडत नाही, असा निष्कर्ष निघाल्यानंतर महाराष्ट्र सरकार 'व्हायबिलिटी गॅप फंडिंग' (व्हीजीएफ) देण्याचा विचार करीत आहे. विशेष बाब म्हणजे, आजवर देशात कोणत्याही प्रवासी बोटसेवेला राज्य सरकारकडून थेट आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. महाराष्ट्रात मात्र काही मंत्र्यांच्या हट्टापायी हा नवा प्रयोग केला जात असल्याची चर्चा सुरू आहे.

रो-रोच्या एका फेरीसाठी १८ ते २० हजार लिटर डिझेल आणि सुमारे २० लाख रुपयांपर्यंत खर्च होत आहे. त्यामुळे सध्याच्या तिकीट दरांत ही सेवा चालवणे अशक्य आहे. प्रवाशांना परवडणारे दर ठेवले तर ऑपरेटर तोट्यात जातो आणि खर्च भागवायचा प्रयत्न केला तर तिकीट दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जातात. त्यामुळे या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी सरकार थेट आर्थिक मदत देण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचे बोलले जात आहे. या प्रस्तावासंदर्भात महाराष्ट्र सागरी महामंडळाकडून अंतर्गत हालचाली सुरू झाल्या आहेत. रो-रो सेवा सुरू झालीच पाहिजे, या भूमिकेतून व्हीजीएफ किती काळासाठी आणि कोणत्या अटींवर द्यायची, याचा अभ्यास सुरू आहे, असे सागरी महामंडळाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले आहे. ही मदत न दिल्यास सेवा सुरू होणार नाही आणि दिल्यास देशात नवा पायंडा पाडणारा निर्णय ठरेल, अशी स्थिती आहे. गणेशोत्सवाच्या तोंडावर रो-रो बोटसेवेचे तिकीट दर जाहीर करत आश्वासनांची खैरात करण्यात आली होती.



### पुन्हा एकदा निव्वळ आश्वासन?

ज्या रो-रो सेवेची २०१४पासून सतत घोषणा होत आहे, ती आजही सरकारी कागदपत्रे, सल्लागार अहवाल आणि आर्थिक पॅकेजमध्येच अडकलेली आहे. आता व्हीजीएफ देऊन तरी सेवा सुरू होईल की हेही आणखी एक गाजर ठरेल, असा प्रश्न कोकणवासीय विचारत आहेत. सरकारने स्पष्ट निर्णय घेतला नाही, तर पुढील वर्षी ही तारीख पुन्हा एकदा निव्वळ आश्वासन म्हणून इतिहासात जमा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> “मुंबई-गोवा महामार्ग अपूर्ण आहे. कोकणातील लोकांना खरा दिलासा देणारे काम बाजूला ठेवून मंत्रीमहोदय महागड्या रो-रो बोटीच्या मागे लागले आहेत. आर्थिक गणित जुळत नसल्याने सरकारी खजिन्यातून व्हीजीएफ देण्याची तयारी सुरू आहे. म्हणजे मंत्र्यांच्या हट्टासाठी जनतेच्या पैशांची कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी होत आहे. गणेशोत्सवात मोठे दावे करणारे तेच मंत्री आता मौनात गेले. आधी महामार्ग पूर्ण करा, मग रो-रोची स्वप्ने दाखवा.
> - नाना पटोले, आमदार, काँग्रेस”

## बालकामगाराची केली सुटका

**पनवेल :** सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील पथकाने पनवेल एसटी बस स्टॅण्डसमोरील महाराजा स्वीट या दुकानावर छापा मारुन एका बालकामगाराची सुटका केली. या बालकामगाराला कमी वेतनात अतिश्रमाचे काम देऊन त्याला राबवून घेणाऱ्या दुकानाच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याच्यावर पुढील कार्यवाही सुरू केली आहे. दुकाने निरीक्षक गजानन जोंधळे, सरकारी कामगार अधिकारी स्नेहल माटे, प्रकाश पवार व त्यांच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने महाराजा स्वीट या मिठाईच्या दुकानावर छापा मारला. या वेळी या ठिकाणी १६ वर्षीय मुलगा काम करत असल्याचे निदर्शनास आले. या मुलाची सुटका करून महाराजा स्वीट दुकान मालक नथुराम चौधरी याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याच्यावर पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

# हवाई वाहतूक मंत्र्यांनी माफी मागावी

## ■ खासदार वर्षा गायकवाड यांची मागणी

। मुंबई । प्रतिनिधी ।

सर्वसामान्य माणसांनाही हवाई प्रवास सुलभ करण्याचे नरेंद्र मोदींनी दाखवलेले स्वप्न हे केवळ दिवास्वप्नच राहिले असून हवाई प्रवास हा शोषण व लुटीचे साधन बनला आहे. मागील सहा-सात दिवसांत इंडिगोने जो गोंधळ घातला त्यामुळे हजारो प्रवाशांना प्रचंड मानसिक, शारिरिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला. यावेळी कोणीही प्रवाशांशी संवाद साधला नाही. या गोंधळामुळे भारताची जगात नाच्चकी झाली, हे सर्व एकाच विमान कंपनीच्या मक्तेदारीमुळे झाले असून झालेल्या प्रकाराबद्दल सरकार व विमान वाहतूक मंत्री यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, देशात आधी किंग फिशर, जेट एअरवेज, गो फर्स्ट, एअर डेक्कन, जेटलाईट, एअर सहारा, एअर एशिया इंडिया कंपन्या हवाई क्षेत्रात सेवा देत होत्या; सरकारकडे ठोस धोरण नसल्याने यातील एक एक कपनी बंद होत जवळपास २० विमान वाहतूक कंपन्या बंद पडल्या. आता फक्त एअर इंडिया, विस्तारा, इंडिगो अशा काही मोजक्या कंपन्यांच कार्यरत आहेत. परंतु, यातील सर्वात मोठा हिस्सा हा इंडिगो या एकाच कंपनीकडे आहे आणि या कंपनीच्या मक्तेदारीमुळे परवाचा गोंधळ झाला. मक्तेदारी असल्याने ग्राहकांचे शोषण व लुट सुरु आहे. ५ ते ६ हजार रुपयांचे तिकिट २० ते ३० हजार रुपये झाले. विमानतळावर लोकांना पाणीसुद्धा मिळाले नाही. अडकलेल्या प्रवाशांशी कोणीही संवाद साधला नाही. आता नवी मुंबई विमान तळावरून इंडिगो कंपनीला परवानगी दिली आहे. परंतु, नुकताच झालेला बट्ट्याबोळ पाहता सरकारकडे प्लॅन बी आहे का, असा प्रश्न खासदार वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केला आहे.

### विविध शुल्कांच्या नावाखाली लुट

विमानतळावर प्रवाशांकडून व इंधन सरचार्जच्या नावाखाली मोठी लुट केली जात आहे. पार्किंग चार्जेस एका तासाला ३७०, दोन तासाला ४०० रुपये तर सहा तासाला १ हजार रुपये आकारले जाते. मुंबई विमानतळावरील दुकानदारांकडून अदानी कंपनी भरमसाठ भाडे आकारते व विक्रीतूनही मोठा हिस्सा वसूल करते, अशी दुहेरी लुट सुरु आहे. अदानी कंपनीचा तोटा भरून काढण्यासाठी आता आंतरराष्ट्रीय प्रवाशांकडून १७५ रुपये असलेला शुल्क ३,८५६ रुपये करण्याचा प्रस्ताव दिला आहे, त्याला रोखण्याचा सरकार प्रयत्न करताना दिसत नाही. अदानी कंपनीची मनमानी सरकार खपवून घेत असून मुंबईचा हवाई प्रवास महाग करण्याचा हा प्रकार आहे. ही लुट पाहता एअरपोर्ट अथोरिटी ऑफ इंडियाचे नाव बदलून अदानी अँड सन्स हे नाव ठेवले पाहिजे, असे खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या.

# विद्यार्थी-शिक्षक-पालक सभा उत्साहात संपन्न



। उरण । प्रतिनिधी ।

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १२वी कला शाखेची विद्यार्थी, शिक्षक व पालक सभा प्राचार्य बबन साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली व स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष कृष्णाजी कडू प्रमुख यांच्या उपस्थितीत पार पडली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी दि. रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थी शिक्षक पालक सभेचे महत्त्व स्पष्ट करून आगामी बोर्ड परीक्षेच्या तयारीसंबंधी मार्गदर्शन केले.

तसेच, या सभेत प्रा. सरोदे यांनी निकाल पत्रकाचे वाचन केले. प्रा. बाबुलाल पाटोळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घरगुती वातावरण, पालकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांची आवश्यकता अधोरेखित केली. प्राचार्य बबन साळुंखे यांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे विवेचन करत विद्यार्थ्यांना अभ्यासातील नियमिततेचे महत्त्व पटवून दिले. स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू यांनी विद्यालयाच्या उज्ज्वल निकालांची परंपरा कायम राखण्यासाठी शिस्त, वेळपालन आणि कठोर परिश्रम या तीन घटकांवर भर द्यावा, असे सांगितले.

## माणगावात कोकण फेस्टिव्हल उत्साहात

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथे आयोजित कोकण फेस्टिव्हल २०२५ चा उद्घाटन समारंभ ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या रोषणाईत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कोकणाच्या सांस्कृतिक, नाट्य व कलाविश्वाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाला माणगावसह रायगड जिल्ह्यातील रसिकांची मोठी उपस्थिती लाभली. या उद्घाटन सोहळ्यास सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये, प्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक व चला हवा येऊ द्या फेम डॉ. नीलेश साबळे, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, संजय साबळे व लक्ष्मण दळवी आदी उपस्थित होते.

# महिलांना प्रगत टेलरिंगचे प्रशिक्षण



। उरण । प्रतिनिधी ।

उरणच्या जेएनपीए बंदरातील एपीएम टर्मिनल म्हणजेच जीटीआय बंदराच्या सीएसआर फंडामधून निरामय हेल्थ फाऊंडेशन माटुंगा मुंबई याच्या माध्यमातून उरणच्या पुर्व भागातील पुनाडे ग्रामपंचायत हद्दीतील महिलांसाठी प्रगत शिलाई मशीनचे क्लासेस घेण्यात येणार आहेत.

या कोर्सचे औपचारिक उद्घाटन शनिवारी (दि.१३) करण्यात आले. पुनाडे येथील ग्राम पंचायतीच्या सभागृहामध्ये शनिवारपासून पुढील आठ आठवड्यांचे प्रगत शिलाई मशीनचे क्लासेस घेण्यात येणार आहेत.

दर शनिवारी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत या माध्यमातून येथील गरजू महिलांना प्रगत शिलाई मशीनवर काम कसे करायचे, कशाप्रकारे नव्या फॅशनचे कपडे शिवता येतील, याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण सुचिता जोशी या प्रशिक्षिती शिक्षिका देणार आहेत.

## रेवदंड्यात मटका अड्ड्यावर धाड

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

पारनाका नजीक जनसेवा डेअरीच्या बाजुला कल्याण-मेन नावाचा जुगाराचा मटका चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. रेवदंडा-पारनाका नजीक जनसेवा डेअरीच्या मोकळ्या जागेत लोकांकडून पैसे स्वीकारून चिठ्ठ्यांवर आकडेमोड लिहून कल्याण-मेन नावाचा जुगाराचा मटका बेकायदेशीरपणे चालविला जात होता. अलिबाग स्थानिक गुन्हे अन्वेषक शाखेने शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास या ठिकाणी धाड टाकली. यावेळी ताजपुर येथील अनंत शंकर पाटील यांना रंगेहाथ पकडले. या कल्याण-मेन मटक्याची रक्कम पाटील हे आशिष गोंधळी यांच्याकडे जमा करत असे. त्यामुळे अलिबाग गुन्हे अन्वेषक यांनी या दोघांवर कारवाई करून एकूण ३ हजार ८३५ रूपये रक्कम जप्त केली आहे.

# रस्त्यावर खडी पडल्याने अंजरुन गावाजवळ दुचाकी घसरल्या

। खोपोली । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागासह मुख्य रस्त्यांवर राजरोसपणे ओव्हरलोड वाहतूक होत असली तर, याकडे सपशेल वाहतूक पोलीस शाखेचे दुर्लक्ष होत असल्याने त्यांचा हाच दुर्लक्षपणा अनेक वाहन चालकांसह प्रवाशांच्या जीवावर बेतण्याच्या घटना घडत आहेत.

अंजरुननजीक ओव्हरलोड डंपरमधून खडी मुख्य रस्त्यावर पडल्याने ही मोठमोठाली खडी अपघाताला आमंत्रण असल्याचे पाहायला मिळाले असता या खडीवरून दुचाकी स्लिप झाल्याचे दिसून आले. तर चारचाकी वाहनेही खडीवरून रस्त्याच्या बाजूला जात असल्याचे पाहायला मिळाले असून ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांकडे आरटीओचे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे. तर आरटीओ छोट्या वाहनांवर कारवाई करतात, मात्र ओव्हरलोड वाहतुकीवर का कारवाई करत नाही, असा प्रश्न या घटनेवरून उपस्थित केला जात आहे.

ओव्हरलोड डंपरची वाहतूक दुचाकी वाहनांचं तीन चाकी व छोट्या चार चाकी वाहनांना धोक्याची घंटा देत असल्याचे पाहायला मिळाले असून ओव्हरलोड डंपर मधून खडी रस्त्यावर पडल्याने या खडी वरून दुचाकी स्लिप झाल्याचे पाहायला मिळाले तर तीनचाकी व चारचाकी वाहने ही खडी वरून रस्त्याच्या बाजूला जात असल्याने ही खडी अपघाताला आमंत्रण देत होती. राजरोसपणे सुरू असणाऱ्या ओव्हरलोड वाहतुकीकडे आरटीओ विभाग दुर्लक्ष करत असल्याने ओव्हरलोड वाहतुकीचे प्रमाण वाढू लागल्याने ही वाहतूक अपघाताला आमंत्रण देत असल्याचे पाहायला मिळाले.

पान १ वरून

## विरोधकांना धडा शिकविणार

पूजन पूण्यवाचन, मातृकापूजन, प्रवचन, हरिपाठ, किर्तन, भजन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या पूजेनिमित्त जयंत पाटील, जिल्हा चिटणीस शेकाप सुरेश खैरे, सरपंच आपटवणे अस्मिता बैकर, तालुका चिटणीस अतिष सागळे, खरेदी विक्री संघ चेअरमन किसन उमटे, तालुका सहचिटणीस प्रवीण कुंभार, महिला आघाडी अध्यक्ष समृद्धी यादव, माजी पंचायत समिती सदस्य सविता हंबीर, पाली शहर आघाडी प्रमुख ऋतुजा मेहता तालुक्यातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी तसेच आपटवणे, मुंबई, ठाणे, पुणे, लोणावळा येथील शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

## अत्याचार करणारा १८ वर्षांनी जेरबंद

या आरोपीचे नाव आहे. वसई पूर्वमधील सातिवालीमध्ये अवधराम चाळीत राहणाऱ्या एका दाम्पत्याच्या मुलीचे नंदलाल ऊर्फ नंदू विश्वकर्मा याने अपहरण केले होते. याच चाळीमध्ये नंदू विश्वकर्मा राहत होता. नंदूने मुलीला चॉकलेट घेऊन देतो म्हणून नेले होते. आरोपी मुलीला घेऊन गेला. त्यानंतर तिने चिमुकलीवर अत्याचार केला आणि तिची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणात १ एप्रिल २००७ रोजी मुलीच्या आईवडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून माणिकपूर पोलिसांनी भारतीय दंड संहितेतील कलम ३०२ (हत्या), कलम ३६३ (अपहरण) आणि कलम ३७६ (बलात्कार) असा गुन्हा दाखल केला होता.जुन्या प्रकरणांचा समांतरपणे तपास करण्याचे आदेश पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी दिले होते. पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. त्याच वेळी वसई पोलिसांच्या गुन्हे शाखेला माहिती मिळाली की आरोपी उत्तर प्रदेशात राहत आहे. नंदू हा त्यांच्या मूळ गावातच वास्तव्याला असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या क्राइम डिटेक्शन यूनिट २ ने थेट उत्तर प्रदेश गाठले. १० डिसेंबर २०२५ रोजी पोलिसांचे पथक उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर जिल्ह्यातील खरदौरी गावात जाऊन त्याच्या मुसक्या आवळल्या.

## चिमुकलीवर अत्याचार करुन हत्या

सुरू केली. प्राथमिक तपासात उघड झाले की, घरात अनेकदा एकटी राहणाऱ्या चिमुकलीचा फायदा घेत समीर कुमार मंडळ (वय ३० ते ३५ विवाहित) या आरोपीने तिला घराजवळच काही अंतरावर नेले. तिथे तिच्यावर बलात्कार करून गळा दाबून हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. चौकशीत संपूर्ण घटना उघडकीस आली असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. या अमानुष कृत्यामुळे मावळ परिसरात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

## शालेय स्पर्धेदरम्यान विद्यार्थिनीचा मृत्यू

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विविध आंतरशालेय स्पर्धा महाड येथे यावर्षी आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातून कोकण एज्युकेशन सोसायटीचे अनेक विद्यार्थी महाड येथे दाखल झाले होते.

१२ व १३ डिसेंबर अशा दोन दिवसांकरिता या स्पर्धा महाडमधील चांदे क्रीडांगणावर भरवण्यात आल्या होत्या. यामध्ये वक्तृत्व स्पर्धेसाठी शहाबाज हायस्कूलची निधी म्हात्रे ही विद्यार्थिनीदेखील महाड येथे आली होती. दुपारपासून या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सुरू होता. या कार्यक्रमादरम्यान बक्षीस स्वीकारून परत येत असताना या विद्यार्थिनीला चक्कर आली व ती खाली कोसळली. तिला तातडीने एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. निधीच्या मृत्यूचे निश्चित कारण समजू शकले नाही. निधीचे पालक महाड येथे दाखल झाल्यानंतर तिच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले जाणार आहे. निधी म्हात्रे आकस्मिक मृत्यूमुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये शोककळा पसरली व पारितोषिक वितरण समारंभावर दुःखाचे सावट पसरले होते.

## शेतांमध्ये पांढरा कांदा लागवडीचा मोसम

काळ राहिल्याने लागवड लांबली. त्यामुळे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लागवडीला सुरुवात झाली. शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, यावर्षी लागवड १५ दिवस उशिरा सुरू झाली आहे. काही शेतकऱ्यांनी १५ गुंठे, काहींनी एक ते दोन एकर, तर काहींनी अगदी दोन ते तीन गुंठे क्षेत्रामध्ये, तसेच घराच्या बाजूला परसबाग म्हणून कांद्याची लागवड करण्यास सुरुवात केली आहे. या लागवडीमुळे परिसरातील अनेकांच्या हाताला काम मिळाले आहे. जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत कांदा तयार होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कांदा काढणीपासून माळा तयार करणे आदी कामे या कालावधीत होणार आहेत. यातून महिलांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे.

## मुस्लिम तरुणाची अपघातग्रस्त कॉलेज तरुणीला वैद्यकीय मदत

धर्मीय अधिक जवळ येण्यास मदत झाली आहे.ममदापूर गावातील सातबारा म्हणून ओळखला जाणारा तरुण साकिब पोंजेकर आपल्या कामासाठी नेरळ खांडा येथील सेंटर वन बिल्डिंग समोर उभा होता.दुपारी एक वाजण्याच्या सुमारास शेलू जवळील बांधिवली येथे राहणारी कॉलेज तरुणीला एका दुचाकीने धडक दिली.काही समजण्याच्या आधी तो दुचाकी चालक तेथून पळून गेला. मात्र जखमी कॉलेज तरुणीला साकिब पोंजेकर याने समोरून येणारी टॅक्सी थांबवून त्या टॅक्सीमध्ये त्या जखमी तरुणीला उचलून भरले.केवळ आठ मिनिटात ती जखमी कॉलेज तरुणी डॉ. शेवाळे यांच्या रुग्णालयात दाखल केले. जखमी तरुणीला रुग्णालयात नेत असताना आपल्या अंगावरील पांढरे शुभ्र कपडे याचा विचार न करता साकिब पोंजेकर यांनी उचलेले आणि गाडी मध्ये भरून रुग्णालय गाठले. रुग्णालयात दाखल केल्यावर तेथे पोलीस पोहचले आणि त्यानंतर जखमी तरुणी ही हिंदू धर्मीय असल्याचे समजले. तोपर्यंत साकिब पोंजेकर या मुस्लिम तरुणाला जखमी अवस्थेत रुग्णालयात आणलेल्या दाखल करून उपचार सुरू होईपर्यंत माहिती नव्हते. जखमी अवस्थेतील तरुणीवर उपचार सुरू झाल्यावर बांधिवली येथून त्या तरुणीचे नातेवाईक तेथे पोहचले.तर रस्त्याने चालणाऱ्या तरुणीला धडक देऊन पसार झालेल्या दुचाकीला चालकास नेरळ पोलिसांनी शोधून काढले आहे.दरम्यान,सदर तरुणी ही नेरळ येथे प्राथमिक उपचार घेऊन पुढील उपचारासाठी बदलापूर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले होते.सध्या ही कॉलेज तरुणी आपल्या घरी विश्रांती घेत आहे. या माणुसकीच्या दर्शनाबद्दल मुस्लिम धर्मीय तरुण साकिब पोंजेकर यांचे कौतुक होत आहे.

## कामोठे सर्विस रोड महामार्गाला जोडा

महामार्गाला पर्यायी जोडणी मिळाल्यास सेक्टर ५, ६, ६अ, ७, ८ आणि ९ मधील नागरिकांचा प्रवास अधिक सुकर होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी अमोल शितोळे यांची मागणी करताना सांगितले आहे की, कामोठे बस स्टॉपजवळील सर्विस रस्ता महामार्गाला तातडीने जोडावा, सेक्टर ६अजवाहर इंडस्ट्री कळंबोली सर्विस रस्ता पुन्हा सुरु करावा, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, नागरिकांचे जीवन आणि इंधन दोन्ही वाचवण्यासाठी प्रशासनाने त्वरीत कृती करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## १७,९२० प्रकरणांचा निपटारा

कक्ष स्थापन करण्यात आले होते. पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलद्वारेही अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या मिटविण्यात आली. या राष्ट्रीय लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील संघटना, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधीक्षक व पोलीस कर्मचारी तसेच सर्व पक्षकारांनी दिलेल्या सहकार्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी अध्यक्ष तथा प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. सृष्टी निळकंठ आणि सचिव तेजस्विनी निराळे यांनी आभार मानले.

## १००० कोटींच्या सायबर फ्रॉड रॅकेटचा भांडाफोड


तपासानुसार, हे सायबर फ्रॉड नेटवर्क देशातील अनेक राज्यांमध्ये सक्रिय होते. भ्रामक लोन ॲप्स, बनावट गुंतवणूक स्किम्स, पोंझी व MLM मॉडेल्स, खोट्या पार्ट-टाईम जॉब ऑफर्स आणि फसव्या ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना लक्ष्य करण्यात आले. विविध स्वरुपातील फसवणूक असली तरी त्यामागे एकाच सिंडिकेटचा हात असल्याचे तपासातून समोर आले आहे.या प्रकरणात ऑक्टोबर २०२५ मध्ये सीबीआयने तीन प्रमुख भारतीय सहयोगींना अटक केली होती. त्यानंतर तपासाचा आवाका वाढवण्यात आला आणि सायबर तसेच आर्थिक व्यवहारांचे सखोल विश्लेषण करण्यात आले. गृह मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या Indian Cyber Crime Coordination Centre (I4C) कडून मिळालेल्या इनपुटच्या आधारे हा गुन्हा नोंदवण्यात आला.

सुरुवातीला स्वतंत्र तक्रारींसारखे वाटणारे हे प्रकरण, ॲप्स, फंड फ्लो पॅटर्न, पेमेंट गेटवे आणि डिजिटल फूटप्रिंटच्या सखोल विश्लेषणानंतर एका मोठ्या नेटवर्कशी जोडले गेले.हाय-टेक पद्धतीने फसवणूक तपासात समोर आले की, गुन्हेगारांनी अत्यंत लेयर्ड आणि टेक्नॉलॉजी-ड्रिव्हन पद्धती वापरल्या. Google Ads , बल्क SMS , SIM-बॉक्स आधारित मेसेजिंग सिस्टम, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, फिनटेक प्लॅटफॉर्म्स आणि अनेक म्यूल बँक अकाउंट्सचा वापर करुन खऱ्या सूत्रधारांची ओळख लपवण्यात आली.

# निवारा शेडच्या कामाला सुरुवात

। नेरळ । प्रतिनिधी ।

मध्य रेल्वेवरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकाचे मेकओव्हर सुरू आहे. त्याच माध्यमातून नेरळ स्थानकात फलाट दोनवर नव्याने निवारा शेड उभारण्याचे काम सुरू झाले आहे. फलाट दोनवर उपनगरी लोकलचे जेमतेम तीन-चार डब्बे यांच्या भागात उभ्या असलेल्या प्रवाशांना निवारा शेडचा लाभ मिळत होता. त्यामुळे फलाट दोनवर निवारा शेड बांधण्याची अनेक वर्षापासूनची मागणी होती. या ठिकाणी आता निवारा शेड उभारण्याचे काम वेगाने सुरू असून लवकरच नेरळ स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना निवारा शेडचा फायदा मिळणार आहे.



नेरळ स्थानकाची निर्मिती झाल्यापासून अगदी ब्रिटिश काळापासून नेरळ स्थानकात उपनगरीय लोकलचे जेमतेम तीन-चार डब्बे उभे राहतील एवढेच निवारा शेड होते. त्यात फलाट दोनवरील प्रवासी निवारा शेड हे ब्रिटिश काळातील हेरिटेज प्रॉपर्टी असल्याने मध्य रेल्वे प्रशासन यांच्याकडून ठोस असा कोणताही निर्णय घेतला जात नव्हता. त्याचवेळी हेरिटेज शेड हे तोडण्यास हरकत घेतली जात असल्याने शेवटी मध्य रेल्वेकडून निवारा शेड उपलब्ध करून देण्यावर बंधने येत होती. त्यामुळे प्रवासी वर्गाला उन्हा-पावसात निवारा शेडशिवाय राहण्याची वेळ यायची. नेरळ स्थानकात ज्या वेळी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक किंवा स्थानिक खासदार यांच्या भेटी होत; त्यावेळी कार्यकर्ते नेरळ प्रवासी संघटना यांच्याकडून फलाट दोनवरील निवारा शेडबद्दल विषय येत होता. मात्र, नेरळ स्थानकाच्या मेकओव्हरमध्ये खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडून फलाट एकमधील विकासकामे पूर्ण झाल्यावर फलाट दोनवरील विकासकामे मार्गी लावली जातील, असे जाहीर करण्यात आले होते. आता खऱ्या अर्थाने नेरळ स्थानकात फलाट एकवर प्रवासी निवारा शेड उभारण्याच्या कामाला मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून गती देण्यात आली आहे. नेरळ स्थानकात फलाट दोनवर सुद्धा प्रवासी निवारा शेड उभे राहत असल्याने प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

## आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस संपन्न

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक हॉल या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक साप्ताहिक सभेत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस संपन्न झाला.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली मानवी हक्क दिवस कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मानवी हक्क म्हणजे काय, मानवी हक्क दिवस का साजरा केला जातो, भारतातील मानवी हक्कांचे संरक्षण, मानवी हक्कांचे महत्व व विद्यार्थ्यांनी काय शिकावे तसेच सायबर सुरक्षितता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधी कायदे व अधिकार याबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमास १५० ते २०० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## शेलू गावातील ३५ वर्षे जुना वाद न्यायालयात तडजोडीने मिटला

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत दिवाणी न्यायालयात शेलू गावातील भाऊबंदकी मधील दावा १९९१ पासून सुरू होता.हा दावा याच गावातील वकील आणि कर्जत बार असोसिएशनचे उपाध्यक्ष अ‍ॅड संदीप बागडे यांनी पुढाकार घेऊन सामोपचाराने मिटविला.

दोन्ही पक्षकार यांनी आपल्या गावातील अ‍ॅड बागडे आणि अ‍ॅड पेमारे या वकिलांच्या सूचनेचा मान राखत हा अनेक वर्षे प्रलंबित असलेला दावा तडजोडीने मिटविला.दरम्यान तब्बल ३५ वर्षे प्रलंबित असलेला दावा सामोपचाराने मिटवण्यात आल्याने वकील आणि पक्षकार यांचे कौतुक होत आहे.

कर्जत दिवाणी कोर्टातील सर्वात जुना दावा अशी ख्याती असलेला दिवाणी दावा नं.३८/१९९१ हा शेलू गावातील वाळकु खारीक वगैरे विरुद्ध बाळू खारीक वगैरे हा अनेक वर्षे सुरू होता.कर्जत तालुक्यातील शेलू गावातील जमिनीबाबतचा एकाच कुटुंबातील भावकीतील जमीन वाटपाचा दावा ३५ वर्षे कर्जत कोर्टात सुरू होता.

त्यामुळे न्यायालयाने प्रतिवादी यांचे वकील अ‍ॅड. बागडे यांना या दाव्याच्या तडजोडीबाबत विशेष प्रयत्न करण्यास सांगितले.त्यांना वादी चे वकील अ‍ॅड विवेक पेठे यांनी सहकार्य केल्याने अखेर हा दावा ३५ वर्षांनी तडजोडीने मिटला व वादी प्रतिवादींना ३५ वर्षांनंतर खरा न्याय मिळाला. या तडजोडीच्या निर्णयाने व ३५ वर्षांनंतर या दाव्याची सुनावणी थांबल्याने दोन्ही पक्षकार समाधान व्यक्त करीत आहेत.

# पाटील कुटुंबियांचे कार्य वाखाण्याजोगे






● (छायाचित्र- अमोल नाईक)

## डॉ. कविता राणे यांचे प्रतिपादन

| संतोष राऊळ |
| अलिबाग |

मी देशाभरात कानाकोपऱ्यात फिरते तेव्हा तेथील आणि आपल्या रायगडच्या शिक्षणात मोठी तफावत पाहते. त्यामुळे जे काम अलिबागसह रायगडमध्ये झाले ते काम कोकणात इतर ठिकाणी एवढ्या प्रमाणात झालेले दिसत नाही आहे, त्यामुळे शिक्षण क्षेत्रात स्व. प्रभाकर पाटील यांच्यासह संपुर्ण पाटील कुटुंबियांनी काम केलेले आहे, ते वाखाण्याजोगे आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिद्ध वृत्त निवेदिका, जय महाराष्ट्र या वृत्तवाहिनीची डेप्युटी एडिटर डॉ. कविता राणे यांनी केले आहे.

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात गुणगौरव सोहळ्याचे रविवारी (दि.१४) आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, महाराष्ट्रातील प्रसिद्ध वृत्त निवेदिका, जय महाराष्ट्र या वृत्तवाहिनीची डेप्युटी एडिटर डॉ. कविता राणे आदी मान्यवरांसह संस्थेचे प्रशासकीय सल्लागार गबाजी गीते, पीएनपी कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, कॉलेज प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्राचार्य रविंद्र पाटील, मुख्याध्यापक निलेश मगर, प्रशासन अधिकारी हिरेन राठोड, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, ॲकॅडमिक डायरेक्टर राजश्री पाटील, लेखापाल मनिषा रेलकर, अंकित भानुशाली इतर प्राचार्य, मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. कविता राणे पुढे म्हणाल्या की, मी जेव्हा आवासमधील शाळेत शिक्षण घेत होते तेव्हा धोकवडे येथे पंत पाडाव्यानिमित्त शेकापतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन केले जायचे. त्यावेळी वक्तृत्व स्पर्धेत व वेगवेगळ्या स्पर्धेत क्रमांक पटकविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिस दिले जायचे. मात्र, फक्त बक्षिस मिळायचे म्हणून हा कार्यक्रम आमच्या लक्षात राहिला नाही. त्यावेळी स्व. प्रभाकर पाटील हे आम्हाला सभागृहात बोलवायचे. त्यानंतर कोणाकोणाचा भाषणात नंबर आला आहे, त्यांना पुढे बोलवायचे आणि ते भाषण आम्हाला बोलायला सांगायचे. त्यावेळी ते प्रत्येकाच भाषण कान देऊन ऐकायचे. एखाद्याचे भाषण व्यवस्थित झाले की ते खिशातून शंभर रुपयाची नोट काढून द्यायचे. तिच आमच्या भाषणाची पोच पावती असायची. कोणी मोठी व्यक्ती आमचे भाषण ऐकते आणि आमचा सन्मान करते याचे कौतुक असायचे. मुलांना सन्मानित केल्यावर त्यांच्यात जी भावना, उत्साह आणि प्रेरणा निर्माण केली जाते त्याची काय गरज असते, हे स्व. प्रभाकर पाटील यांना त्यावेळी कळाले होते. त्याची अनुभूती आज या गुणगौरवच्या व्यासपिठावर आल्यावर झाली. मी देशातील कानाकोपऱ्यात फिरताना तेथील आणि आपल्या शिक्षणात मोठी तफावत पाहते. त्यामुळे जे काम अलिबागसह रायगडमध्ये झाले ते काम कोकणात तळागाळात इतक्या प्रमाणात झालेले नाही. त्यामुळे रायगडच्या शिक्षण क्षेत्रात स्व. प्रभाकर पाटील यांच्यासह संपुर्ण पाटील कुटुंबियांनी काम केलेले आहे ते वाखाण्याजोगे आहे, असे महाराष्ट्रातील प्रसिद्ध वृत्त निवेदिका, जय महाराष्ट्र या वृत्तवाहिनीची डेप्युटी एडिटर डॉ. कविता राणे म्हणाल्या.

या गुणगौरव कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, स्व. प्रभाकर पाटील यांचे नाव शिक्षण क्षेत्रात पुढे नेण्यासाठी आणि ग्रामीण भागातील मुलांना खऱ्या अर्थाने उच्च शिक्षण देण्यासाठी आमचे नेते संस्थेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी पीएनपी एज्युकेशन सोसायटी संस्था सुरू केली. सध्या पीएनपी एज्युकेशन संस्था ही प्रगती पथावर आहे. दरवर्षी संस्थेत सुधारणा होत आहे. दरवर्षी विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या थाटामाटात प्रभाविष्कार नावाने केला जातो. त्यापैकी हा गुणगौरव हा पहिला कार्यक्रम असतो. यापुढे, आहे ते टिकवणं आणि प्रत्येक दहा गावांना एक आधुनिक पद्धतीची सीबीएसई शाळा देणे हे मुख्य ध्येय आहे. आज संस्थेच्या जिल्हाभर कानाकोपऱ्यात मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. या संस्थेची सुरूवात पडक्या इमारतीपासून झाली आहे. त्यावेळी कमी विद्यार्थी होते आणि आता पीएनपी संस्थेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच, पीएनपी संस्थेतील शाळा व महाविद्यालयचा निकालही शंभर टक्के लागतो, त्यामुळे विद्यार्थ्यांना घडविण्याबरोबरच संस्थेच्या प्रगतीमध्ये शाळेतील कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार चित्रलेखा पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रांत वार्डे यांनी केले. तर, आभार प्रा. दिनेश पाटील यांनी मानले.

### विद्यार्थ्यांसह अनेकांचा गुणगौरव

यावेळी विद्यार्थ्यांसह अनेकांचा गुणगौरव करण्यात आला. त्यात शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळा, संस्थेत पहिल्या तीन क्रमांकांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, ८० टक्क्यांच्या वर गुण प्राप्त केलेले विद्यार्थी, विषयानुसार संस्थेत प्रथम क्रमांक मिळविले विद्यार्थी, शाळांतील, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा चित्रलेखा पाटील व डॉ. कविता राणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# श्रीवर्धनला वाहतूक कोंडीचे ग्रहण कायम

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी श्रीवर्धन येथे पर्यटक येण्याचे प्रमाण वाढले आहे. सध्या शालेय सहलीच्या बसेस देखील मोठ्या प्रमाणात श्रीवर्धनमध्ये दाखल होत आहेत. त्यात पर्यटकांच्या खासगी वातानुकूलित बसेस, एसटी महामंडळाच्या लालपरी आणि इतर खासगी वाहनांची मोठ्या प्रमाणात रेलचेल सुरू आहे. श्रीवर्धनमधील अरूंद रस्त्यांमुळे दोन मोठी वाहने पास होताना त्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच, शहरात वाहनतळ उपलब्ध नसल्याने पर्यटक आपली वाहने जागा भेटेल तेथे उभी करत आहेत. परिणामी अनेकदा वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. त्यामुळे स्थानिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.




श्रीवर्धन तालुक्यातील निसर्गरम्य आणि शांत वातावरण अनुभवण्यासाठी सुट्टीच्या दिवशी असंख्य पर्यटक येत असतात. त्यातच सध्या शालेय सहलींचे देखील मोठ्या प्रमाणात आयोजन केले जात आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी देखील लालपरीतून श्रीवर्धनमध्ये दाखल होत आहेत. सर्वाधिक पर्यटक हे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी श्रीवर्धन पुर्णतः गजबजलेले असते. त्यामुळे व्यावसायिकांची चांदी होत असली तरी स्थानिक नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. श्रीवर्धन नगरपरिषद इमारतीपासून वाणी आळी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भगवान महावीर मार्ग आणि टिळक रस्ता या अरुंद रस्त्यावर बाजारपेठ आहे. येथील व्यापारी वर्गांची मालवाहतूक वाहने अनेक वेळा आपापल्या दुकानाजवळ उभी केलेली असतात. वाहनातील संपूर्ण सामान उतरवेपर्यंत वाहन एकाच जागेवर उभे राहिल्याने त्या कालावधीत वाहतूक कोंडी होते. तसेच, ग्राहक देखील आपल्या दुचाकी मिळेल त्या ठिकाणी उभ्या करीतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत आणखी भर पडते. त्यातच अरूंद रस्त्यांमुळे शालेय सहलीच्या बसेस तसेच पर्यटकांच्या बसेस या वाहतूक कोंडीला निमित्त ठरत आहेत.

> पोलीस वाहतूक नियमनाचे काम करीत आहे. त्याकरिता स्थानिक व पर्यटकांनी पोलिसांना सहकार्य करणे गरजेचे आहे. शहराला रस्ता रुंदीकरण, बायपास रस्ता आणि वाहनतळ यांची नितांत आवश्यक आहे. त्याशिवाय वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकणार नाही.
> – उमेश पाटील, पोलीस निरीक्षक, श्रीवर्धन

# मिनिडोअरधारकांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

| रसायनी | प्रतिनिधी |

मागण्यांच्या पूर्ततेसाठी रायगड जिल्हा विक्रम मिनिडोअर चालक-मालक संघटनेने रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. यावेळी जिल्हाध्यक्ष विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली टाके देवी चालक-मालक संघटना मोहोपाडा अध्यक्ष विकास पारंगे, उपाध्यक्ष बाळाराम कुरंगळे यांच्यावतीने संघटनेच्या मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी स्वीकारले. या निवदेनात, सहा आसनी मिनीडोअर वाहनांची ग्रामीण भागासाठी पाच वर्षे वयोमर्यादा वाढविण्यात यावी. चारचाकी सहा आसनी बीएस फोर मानांकीत बदली वाहनांकरिता इंधन म्हणून सीएनजीच्या वापरास मान्यता मिळावी. कोरोना काळात लागू झालेले सानुग्रह अनुदान विक्रम,



मिनीडोअर, मॅजिक इको या मीटर टॅक्सी परवानाधारकांना मिळावे. व्यवसाय कराचा भरणा करण्यासाठी दंड व व्याज न आकारता सूट मिळावी. इको टॅक्सीला नवीन डिव्हाईस बसविण्यासाठी अतिरिक्त खर्च होत आहे, त्यामुळे ही तांत्रिक लूट थांबविण्यात यावी. ऑनलाईन टॅक्सी परमीट बंद करावे. १५ वर्षांवरील मिनीडोअर पासिंग साडेचार हजार रुपयांवरून ९ हजार रुपये इतकी करण्यात आली आहे, ती रद्द करण्यात यावी, अशा अनेक मागण्या मोर्चाच्या माध्यमातून विक्रम मिनिडोअर धारकांनी केल्या आहेत.

# ग्रामसभेला लोकनियुक्त सदस्यांची दांडी

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी हद्दीतील आपटा ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ग्रामविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ग्रामसभेला ग्रामपंचायत सदस्यांनीच पाठ फिरवल्याने सलग १३व्या वेळी ग्रामसभा तहकूब करण्याची नामुष्की ओढवली आहे. विशेष म्हणजे या सभेला १३ पैकी सर्वच्या सर्व १३ सदस्य गैरहजर राहिल्याने ग्रामस्थांमधून आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे. या ग्रामसभेला केवळ सरपंच, ग्रामसेवक आणि सात ग्रामस्थ उपस्थित होते.

आपटा ग्रामपंचायतीतील ग्रामविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ग्रामसभेला



लोकनियुक्त सदस्यांनीच सभेला दांडी मारल्यामुळे कोरम (गणसंख्या) अपूर्ण राहिला आणि सभा तहकूब करावी लागली. सदस्यांच्या या उदासीनतेमुळे आपटा गावाच्या विकासाचे महत्त्वाचे निर्णय पुन्हा एकदा रखडले आहेत. एकीकडे ग्रामसभा होत नसल्याने निर्णय प्रक्रियेत अडथळे येत आहेत; तर, दुसरीकडे गावात समस्यांचा डोंगर उभा राहिला आहे. आपटा ग्रामपंचायतीतर्फे ग्रामस्वच्छता अभियान राबवले जात नाही, जलजीवन मिशनची योजना बंद पडली आहे, गावातील गटारांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत आणि गावतळी अस्वच्छ झाली आहेत. तसेच, गावातील पथदिव्यांची दुरुस्तीही वेळेवर केली जात नाही. अशा अनेक समस्यांमुळे गावकरी त्रस्त झाले आहेत. ग्रामपंचायत सदस्यांच्या विकासकामे न करण्याच्या आणि सभांना उपस्थित न राहण्याच्या उदासीन वृत्तीमुळे गावाचा विकास खुंटला आहे. अशा सदस्यांवर शासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी आता संतप्त आपटा ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

# महिलांसाठी विशेष शिबिराचे आयोजन

| हमरापूर | प्रतिनिधी |

सरकारला राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाबाबत काही देणं राहिले नाही, असे उद्गार राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांनी काढले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवारव त्यांच्या पत्नी प्रतिभा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पेण येथील कार्यालयात पक्षप्रवेश तसेच महिलांसाठी विविध योजनांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर, जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, श्रीहर्ष कांबळे, प्रकाश चव्हाण, संदीप सकपाळ, प्रकाश मोकल, अश्विनी ठाकूर आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.



पुढे बोलताना राज राजापूरकर यांनी, न्याय देऊन महिला वर्गाला सक्षमीकरणाच्या माध्यमातून प्रगतीपथावर नेणारा राज्यातील एकमेव पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षच आहे. सत्ताधारी फक्त नोटा मोजण्यात गुंतले आहेत. राज्यात ओबीसींचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी पवार साहेबांबरोबर खासदार सुप्रिया सुळे या सुद्धा तितक्याच ताकतीने काम करत असून लवकरच त्यांच्या उपस्थितीत ओबीसी महिलांचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमादरम्यान अश्विनी ठाकूर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला असून त्यांची ओबीसी महिला जिल्हाध्यक्षपदावर नियुक्ती करण्यात आली.

वणव्यात वनसंपत्तीची मोठी हानी | गस्त वाढविण्याबाबतीत वनविभागाचे दुर्लक्ष

# रामधरणेश्वर डोंगर आगीत खाक

| अब्दुल सोगावकर |
| सोगाव |

अलिबाग तालुक्यातील पर्यटनदृष्ट्या असलेल्या रामधरणेश्वरच्या डोंगरावर वणवा लागण्याची घटना घडली. या वणव्यात कोट्यवधींची वनसंपदा जळून नष्ट झाली आहे. दरम्यान, या वनक्षेत्रात वणवा लागल्याचे समजताच सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या शर्थीने ही आग आटोक्यात आणली. मात्र, दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी पुन्हा वणवा लागून उरलासुरला डोंगर देखील जळून खाक झाला आहे. याबाबत वनक्षेत्रात गस्त वाढविण्याबाबतीत वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याने पर्यावरण प्रेमींनी नाराजी व्यक्त केली.

अलिबाग तालुक्यातील रामधरणेश्वर डोंगरावर रविवारी




(दि.१४) दुपारच्या वेळी वणवा लागण्याची घटना घडली. वणवा लागल्याचे समजताच सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून वणवा लागल्याची माहिती दिली. या डोंगरावर मोठ्या प्रमाणात आदिवासी वस्ती आहे. त्यानंतर वन कर्मचारी घटनास्थळी पोहोचेपर्यंत आणि काही विपरीत घडण्याआधी सचिन घाडी यांनी आपल्या मित्रमंडळीसह वणव्याच्या ठिकाणी जाऊन मोठ्या मेहनतीने आग आटोक्यात आणली. रामधरणेश्वर डोंगराच्या वरील बाजुस पंचक्रोशीतील गायी, बैल, म्हशी, बकऱ्या आदी पाळीव जनावरे मोठ्या प्रमाणात चरत असतात. या वणव्यामुळे त्यांच्या चाऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर याठिकाणी औषधी वनस्पती, रानटी मेवा, निरनिराळ्या प्रकारच्या पक्ष्यांची अंडी व त्यांचा निवारा असल्याने जळून त्यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्यासह नितेश ठकरूळ, संदेश वाघमारे, गणेश पवार, रामजी पवार, अनिल पिंगळा, मोतीराम पारधी, सागर लेंडे तसेच वनविभागाचे वनरक्षक आकांक्षा खांडवे, कावेरी दराडे, राम टाकरस, निखिल दणाने हे आग विझविण्यासाठी आल्यामुळे त्या सर्वांचे पर्यावरणप्रेमींनी आभार मानले.

### वणव्यामुळे भोगावे लागणारे परिणाम

वणवा लागल्यामुळे वातावरणात बदल होऊन उष्णता वाढते. वनक्षेत्रात असणाऱ्या वन्यजीवांच्या पारंपरिक खाद्याचे नुकसान होते. परिणामी वन्य प्राणी खाद्य नसल्यामुळे डोंगर पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये येऊन शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांना व मानवजातीला धोका निर्माण करतात. डोंगरावर असणारे जीवजंतू, सरपटणारे प्राणी, बिबटे, माकडे, डुकरे व इतर प्राणी मानवी वस्तीत येऊन नुकसान करण्याची देखील शक्यता वाढते. यांसारखे वणवा लागल्यामुळे अनेक धोके संभवतात.

> वनविभागाने आग लावणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन कडक कारवाई करावी. या पुढील काळात वनविभागाच्या क्षेत्रात वनकर्मचारी यांची गस्त वाढवत पर्यावरणाची हानी होऊच नये यासाठी कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. या वणव्यात गुरांचा चारा नष्ट झाल्याने ते डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात घुसतात आणि शेतीची नासधूस करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. तसेच, आग विझवण्याची यंत्रसामग्री आणि पुरेसे मनुष्यबळ वनविभागाकडे नसल्याचे दरवेळी निदर्शनास येत आहे. त्यामुळे त्यांनी याची काळजी घ्यावी.
> – सचिन घाडी, सामाजिक कार्यकर्ते

## निवडक

### कामोठ्यातील तरुणावर चाकूने वार

**पनवेल :** कामोठे येथील दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून चाकूने वार करून जखमी केल्याप्रकरणी तिघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कामोठे येथील गौरव काकडे (२८) व त्याचा मित्र फैजान मुलानी हे दुचाकीवर सेक्टर-६ येथे गेले होते. ते तेथील पान टपरीवर गेले असता त्या ठिकाणी समर्थ मोरे, प्रतीक साठे, आणि आर्यन हे तरूण उभे होते. त्यावेळी समर्थ मोरे हा गौरवच्या जवळ आला आणि त्या दिवशी मला अपशब्द का वापरले, असा जाब विचारला. यावेळी अपशब्द वारले असतील तर माफी मागतो, असे गौरव म्हणाला. तरीदेखील समर्थ मोरेने गौरवला मारण्यासाठी दगड उचलला. त्यानंतर आर्यन याने चाकू काढला आणि गौरवच्या उजव्या हातावर वार केला. यादरम्यान, गौरवचा मित्र फैजान मध्यस्तीसाठी आला असता समर्थ, आर्यन आणि प्रतिक या तिघांनी त्याला कमरेच्या पट्ट्याने आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली. तसेच, त्याच्या छातीवर व पोटावर चाकूने वार करून जखमी केले आणि तेथून पळ काढला.

### अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** तळोजा परिसरात राहणाऱ्या तीस वर्षीय विवाहितेवर अत्याचार केल्याप्रकरणी संदीप याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तीस वर्षीय विवाहित महिलेला संदीप याने मे महिन्यात प्रपोज केला होता. त्यावेळी त्या महिलेने नकार दिला. त्यानंतर त्याने जूनमध्ये महिलेच्या घरात प्रवेश करून तिच्यावर अत्याचार केला आणि तिच्या मुलासह तिला मारण्याची धमकी दिली. त्यानंतर जुलै महिन्यात पुन्हा त्याने तिच्यावर अत्याचार केला. यावेळी संदीपने पिडीतेला रस्त्यामध्ये गाठून तिच्या कुटुंबाला संपवण्याची धमकी दिली. याबाबत पीडितेने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून संदीप याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नातेवाईकांनी घरातील दागिने चोरले

**नवीन पनवेल :** विचुंबे येथील राधिक चौहान यांच्या घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाईकाने घरातील दागिने चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक शुक्रवारी (दि.५) त्यांच्या घरी आले होते. त्यांनी रात्रीचे जेवण करून तेथेच मुक्काम केला. त्यानंतर घरातील सर्व झोपी गेले. सकाळी राधिका चौहान या उठल्या असता त्यांना त्यांचा मोबाईल दिसून आला नाही. भिंतीच्या खिळ्याला टांगून ठेवलेल्या बॅगेसह रोख रक्कम १५ हजार रुपये, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मनगटी घड्याळ व एटीएम कार्ड देखील सापडून आले नाहीत. त्याचबरोर घरातील साहित्य विस्कटलेले दिसले. यादरम्यान त्यांचे नातेवाईक देखील कुठेच दिसले नाहीत. त्यामुळे त्या दोघांनीच चोरी केल्याचा संशय घेत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### २२ लाख ८९ हजारची फसवणूक

**नवीन पनवेल :** २२ लाख ८९ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी रवी कुमार यादव याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घोटकॅम्प-तळोजा येथील पवन पाटील यांना ३० ऑगस्ट रोजी रविकुमार यादव याने संपर्क साधून बँक आणि गुगल पे खाते ब्लॉक झाल्याचे सांगितले. तसेच, ते चालू करण्यासाठी ओटीपी पाठवतो तो द्या, त्यानंतर तुमच्या अकाउंट चालू होईल, असे सांगितले. यावेळी पवन पाटील यांनी जवळपास १५ ते २० ओटीपी रविकुमार यादव याला दिले. त्यानंतर त्यांच्या खात्यातून २२ लाख ८९ हजार रुपये गायब झाल्याचे निदर्शनास आले.


### 'हुतात्म्यांच्या गावाला मैदानाची गरज'



**चिरनेर :** उरण तालुक्यातील धुतूम हे हुतात्म्यांचे गाव आहे. १९८४ च्या ऐतिहासिक आंदोलनात धुतूमचे शेतकरी हुतात्मे झाले आहेत. त्यामुळे सिडकोने तातडीने धुतूम गावाला अधिकृत मैदान दिले पाहिजे. मी शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे, परंतु येथील आमदारांनीही सिडकोला धारेवर धरायला हवे. धुतूमच्या सरपंच चांगले काम करीत आहेत. गावाच्या विकासासाठी राजकीय चपला बाहेर ठेवून काम करणे गरजेचे आहे. तरच गावाचा सर्वांगीण विकास होईल, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी केले आहे. धुतूम येथे भैरवनाथ चषकाचे उद्घाटन शनिवारी (दि.१३) महेंद्र घरत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. मनीष पाटील, माजी सरपंच शंकर ठाकूर, सरपंच सुचिता ठाकूर, माजी सरपंच शरद ठाकूर, मुरलीधर ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, निर्मला ठाकूर, सचिन ठाकूर, विवेक म्हात्रे, आनंद ठाकूर यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कृषी अधिकाऱ्यांकडून आंब्याची पाहणी

**पाताळगंगा :** तालुक्यातील शेतकरी भात लागवड समवेत आंबे तसेच विविध फळाचे उत्पन्न घेत असतो. कोकणातील शेतकरी आंब्याचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेत असतात. सध्या हिवाळा ऋतू सुरू असतांना हापूस आंब्यांना मोहर येण्यास प्रारंभ झाला असला तरी बदलत्या वातावरणामुळे मोहरावर विपरीत परिणाम होऊन मोहर गळती होत असते. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी खालापूर तालुक्यातील खानाव व खांबेवाडी येथे तालुका



कृषी अधिकारी सुनिल निंबाळकर यांनी शेतकरी मंगेश धामणसे यांच्या आंब्याची पाहणी करून शेतकरी वर्गास मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी रावसाहेब आंधळे व कृषी सहाय्यक अधिकारी सूर्यकांत मुंढे, तसेच खानाव येथील शेतकरी मंगेश धामणसे आणि परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते. आंबा पिकासाठी केलेले मार्गदर्शन शेतकरी वर्गास लाभदायक ठरणार असून यापासून अधिक उत्पन्न मिळणार असल्याची भावना शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.

# आधुनिक व्यसनमुक्ती

ऑस्ट्रेलियामध्ये सोळा वर्षांखालील मुलांना फेसबुक, टिकटॉक, इन्स्टाग्राम इत्यादी सोशल मिडियाचा वापर करण्यास बंदी करण्यात आली आहे. इंटरनेटोत्तर जगातला हा अभूतपूर्व असा निर्णय आहे. मात्र एका दृष्टीने हा गाडीची चाके उलटी फिरवण्याचा अशक्यप्राय प्रयत्न असून त्याकडे सर्व जगाचे लक्ष लागलेले असेल यात शंका नाही. येशू ख्रिस्ताचा जन्म झाला तेव्हापासून नव्या काळाची सुरुवात झाली असे मानण्यात आले. म्हणून कालमापन करताना ख्रिस्तपूर्व (बीफोर ख्राईस्ट- बीसी) आणि ख्रिस्तोत्तर (एडी - एनो डॉमिनी ज्याचा लॅटिन भाषेतील लाक्षणिक अर्थ ख्रिस्त आल्यापासूनचे वर्ष असा होतो) अशी काळाची विभागणी करण्यात आली. पण या विभागणीला आता दोन हजार वर्षे लोटली असून ती बदलण्याची वेळ आली आहे. आधुनिक युगामध्ये इंटरनेटपूर्व काळ आणि इंटरनेटनंतरचा काळ अशाच रीतीने कालखंडांचे मोजमाप करावे लागेल. इंटरनेटचा वापर साधारण १९९० च्या दशकात सुरू झाला. पण गेल्या २५ वर्षांमध्ये त्याला कमालीची गती आली. आता जेथील आदिवासींना संरक्षण देण्यासाठीच आधुनिक जगापासून वेगळे ठेवण्यात आले आहे असे अंदमानातल्या जारवा आदिवासींसारखे लोक वगळता, जगात इंटरनेटने स्पर्श केलेला नाही अशी लोकवस्ती नसेल. गरीब, श्रीमंत, काळे, गोरे, मागास, पुढारलेले अशा सर्वांना इंटरनेटने वेढून टाकले आहे. मोटारगाड्या किंवा घरातली वॉशिंग मशीन्स यासारखी यंत्रे किंवा, टीव्हीसारखी साधने यांचा वापर ९५ मध्ये अमेरिकेत सर्रास होत होता. भारतात मात्र ही यंत्रे खूप थोड्या लोकांकडे होती व ती पाहायला मिळणेही मुश्किल होते. आता आपल्या देशाची स्थिती सुधारली तसतशी ही साधनेही घरोघरी पोचली आहेत. पण इंटरनेटचे तंत्रज्ञान हे सर्वाधिक वेगाने जगभर पसरले व अजूनही पसरत आहे. अमेरिकेतील सर्वात श्रीमंत माणूस शेअरमध्ये गुंतवणूक करण्यासाठी जी माहिती इंटरनेटवरून मिळवू शकेल तीच माहिती आपल्या रायगडमधला कातकरी आदिवासीदेखील, मनात आणले तर, त्याच वेळी मिळवू शकेल व तिचा वापर करू शकेल. आज आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआयचा वापर अमेरिकेत जितका होत नाही तितका तो भारतात होतो आहे.

## सर्वांनाच लागले व्यसन

त्यामुळेच, गुगल, अमेझॉन, मेटा (फेसबुक व व्हॉटसची कंपनी) यांनी येत्या पाच वर्षांमध्ये भारतात एआयच्या संशोधनासाठी व डाटा सेंटरच्या उभारणीकरिता हजारो कोटी डॉलरची गुंतवणूक करण्याचे जाहीर केले आहे. भारतात अजूनही मोटारगाड्या किंवा विमानांची इंजिन्स पूर्णपणे तयार होत नसतील, लॅपटॉप किंवा मोबाईल फोन्सचे महत्वाचे भाग चीनमधूनच आयात करावे लागत असतील. पण सॉफ्टवेअर तयार करणे किंवा एआयचा वेगवेगळ्या रीतीने वापर करणे यामध्ये मात्र आपल्याकडच्या इंजिनिअर्सनी चांगलाच चतुरपणा दाखवला आहे. दुसरीकडे आपल्याकडे इंटरनेट इतके स्वस्त व सहजा उपलब्ध आहे की, रेशनवरचे धान्यही परवडू न शकणाऱ्या माणसापर्यंत देखील ते पोचले आहे. व्हॉटसॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम अशासारखा सोशल मिडिया आणि युट्यूबसारखा अखंड वाहणारा धबधबा यामुळे माणसे मोबाईलला जखडली जाऊ लागली आहेत. अगदी एक-दोन वर्षांच्या मुलापासून निरक्षर खेडवळ वृध्दांपर्यंत सर्वांना मोबाईलने व्यसन लावले आहे. लहान मुलांनी न रडता जेवावे किंवा मस्ती करू नये म्हणून त्यांच्या हातात त्यांच्या आयाच मोबाईल देऊ लागल्या आहेत. यामुळेच अगदी लहान वयामध्ये मुलांना हे व्यसन लागू लागले असून नंतर ते सोडवणे कठीण होऊन बसले आहे. हा केवळ भारताचाच नव्हे तर बहुसंख्य जगाचा अनुभव असून मुलांना मोबाईलपासून कसे दूर करावे यासाठी आता मोठे विचारमंथन सर्वत्र चालू आहे. त्यातच आता एआयचे चॅट जीपीटी, गुगल जेमिनाय यासारखी साधने आल्यामुळे तर कहर झाला आहे. शाळेतले छोटे प्रोजेक्ट्स, किंवा कठीण प्रश्न, गणिते इत्यादींची उत्तरे एआयला विचारून वहीमध्ये कॉपी करण्याचे प्रमाण वाढले आहे. स्वतःचा विचार करणे जवळपास थांबू लागले आहे. पालक वा शिक्षक यांना यावर नियंत्रण आणणे कठीण होऊ लागले आहे. एआय हे नक्कीच उपयुक्त तंत्रज्ञान आहे. प्रचंड माहितीचे साठे अगदी थोडक्यात, तुम्हाला हव्या त्या रुपात तुमच्यापुढे हजर करण्याची ताकद त्याच्यात आहे. शिवाय हेही एका सेकंदात घडते.

## भारतानेही विचार करावा

मात्र यामुळे स्वतःच्या बुध्दीने विचार करणे थांबल्यागत झाले आहे. तरुण वयामध्ये व्हॉटसॅप किंवा इन्स्टाग्राम किंवा वेगवेगळे चॅट ग्रूप्स यांचे व्यसन हा आणखी एक चिंतेचा विषय आहे. या गटांमधून अमली पदार्थांच्या व्यसनांपासून दहशतवादी कारवायांपर्यंत अनेक अनिष्ट गोष्टींचे आकर्षण निर्माण केले जाते. याच गटांमधून अश्लील चित्रे व चित्रफिती यांचा मारा होतो व त्याला कोवळ्या वयातील मुले बळी पडतात. सारासार विचारबुध्दी नसण्याच्या वयात असले संस्कार होणे अत्यंत घातक ठरते. यातून मुले अतिशय हिंसक होतात, गुन्हेगारी कृत्ये सहजपणे करू जातात. आईवडील, भावंडे किंवा कोणीही मनुष्यप्राणी यांच्याविषयी प्रेमाच्या वा कळकळीच्या भावना नष्ट होतात. ऑस्ट्रेलिया हा जगातला सर्वाधिक खेळणारा देश मानला जातो. क्रिकेटप्रमाणेच, हॉकी, टेनिस, फुटबॉल, पोहणे इत्यादी खेळांमध्ये या देशाला सतत पदके मिळत असतात. मात्र अशा या देशाला घरबशा, इंटरनेटमध्ये डोके खुपसून बसणाऱ्या तरुणांबाबत चिंता करावी लागली असेल तर ते गंभीर आहे. गेल्या काही वर्षांपासून तेथे सोशल मिडियाच्या वापरावर निर्बंध आणण्याची चर्चा चालू होती. मात्र आता घातलेली बंदी प्रत्यक्षात कशी आणणार हा कळीचा मुद्दा आहे. सध्या तेथील सरकारने सोळा वर्षांखालील मुले सोशल मिडियाचे सदस्य होणार नाहीत हे पाहण्याची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर सोपवली आहे. हे नियम मोडल्यास काही कोटी रुपये दंड आहे. पण फेक प्रोफाईल सर्रासपणे करता येण्याच्या सध्याच्या काळात खोटे वय दाखवून हा वापर सुरू राहणारच नाही याची हमी कोणीही देऊ शकत नाही. दुसरे म्हणजे यामध्ये व्यक्तीस्वातंत्र्याचा मुद्दा घेऊन काहींनी त्याला आक्षेप घेतला आहे. हे प्रकरण कोर्टात जाण्याचे तसेच मुलांच्या व्यसनामुळे त्यांना सोशल मिडिया वापरापासून रोखता न येण्याचे प्रकार घडणार आहेत. त्याला ऑस्ट्रेलिया कसा सामोरा जातो हे पाहावे लागणार आहे. सोशल मिडिया म्हणजे केवळ व्यसने वा वाईट गोष्ट असे समीकरण चुकीचे आहे असेही काहींचे म्हणणे आहे. या माध्यमांतून मुलांना प्रेरणा देणाऱ्या वा उत्तम माहिती तसेच ज्ञान देणाऱ्या गोष्टीही सांगितल्या वा दाखवल्या जात असतात याकडे काही जण लक्ष वेधतात. पण याच गोष्टी पालकांच्या निगराणीखाली इतर माध्यमांतून मुलांपर्यंत पोचवणे शक्य आहे. आज ऑस्ट्रेलियात जे घडले तसाच विचार भारतासकट अनेक देशांना येत्या काही काळात करावा लागणार आहे. आज भारतातील बहुतांश तरुण हे रीलसमध्ये अडकून बरबाद होत आहेत. हे रोखण्यासाठी विचार करावा लागणारच आहे.

---

विचार

# नेत्यानाहू यांनी का टाळला भारताचा दौरा?

***पॅलेस्टाईन आणि इस्त्रायलबाबत भूमिका घेताना भारताची कायम कसरत व्हायची. मध्य पूर्वेत इस्त्रायलकडून मोठा नरसंहार होऊनही भारताने या देशाविरोधात भूमिका घेण्याचे टाळले आहे. अलिकडे अमेरिकेशी संबंध फारसे चांगले नसतानाही भारताने इस्त्रायलसोबतची मैत्री बिघडू दिली नाही. असे असताना इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचा भारत दौरा अचाकन स्थगित झाला. त्याबाबत बरीच उलटसुलट चर्चा झाली आहे.***



प्रा. जयसिंग यादव

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने इस्रायलचे भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेले संबंध खूप मजबूत आहेत, असे अलिकडे सांगितले. खरे तर याची उजळणी करण्याची काहीच गरज नव्हती; परंतु नेतान्याहू यांच्या कार्यालयाने 'एक्स'वर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, की त्यांची टीम भारतभेटीसाठी नव्या तारखेबाबत चर्चा करत आहे. याचा अर्थ असा, की नेतान्याहू यांचा आगामी भारत दौरा पुढे ढकलला गेलाआहे आणि नवी तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. याचा दुसरा अर्थ असा, की मध्य पूर्वेत घेतलेल्या भूमिकेमुळे नेतान्याहू अनेकांच्या रडारवर आहेत आणि जीविताला धोका असल्याच्या भीतीतून तूर्त त्यांचा दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. दुसरे एक कारण म्हणजे इस्त्रायलचे परपंरागत विरोधी असलेले रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन हे ही नेमके याच काळात भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. 'आय २४ न्यूज' या इस्रायली वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव भारत दौरा रद्द केला आहे. तथापि, 'सुरक्षेच्या कारणास्तव' असा उल्लेख कुठेही अधिकृतपणे उल्लेख करण्यात आलेला नाही. 'आय २४ न्यूज'चे राजनयिक प्रतिनिधी गाय अझ्रिएल यांनी लिहिले आहे, की नेतान्याहू यांची भारतभेट सुरक्षेच्या कारणास्तव पुढे ढकलण्यात आली आहे. दोन आठवड्यांपूर्वी नवी दिल्ली येथे एका दशकाहून अधिक काळानंतर अत्यंत शक्तिशली बॉंबस्फोट झाला. त्यात तेरा लोक ठार झाले तर डझनभर जखमी झाले होते. नेतान्याहू यांनी २०१८ मध्ये शेवटचा भारत दौरा केला होता आणि पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी ते परत येणार होते. आता सुरक्षेच्या मूल्यांकनाच्या आधारे, पुढील वर्षी नवीन तारीख निश्चित होण्याची अपेक्षा आहे.

नेतान्याहू हे मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प या दोघांनाही आपले मित्र म्हणतात. 'आय २४' न्यूजच्या या अहवालाचा हवाला देऊन, भारतीय माध्यमांमध्ये बातम्या पसरू लागल्या, की इस्रायली पंतप्रधानांनी सुरक्षेच्या कारणास्तव आपला भारत दौरा पुढे ढकलला आहे. संध्याकाळपर्यंत इस्रायली पंतप्रधान कार्यालयाला स्पष्टीकरण द्यावे लागले. इस्रायली पंतप्रधान कार्यालयाच्या विधानाबाबत, गाय अझ्रिएल यांनी लिहिले, की सुरक्षेच्या कारणास्तव डिसेंबरमध्ये पंतप्रधान नेतान्याहू यांचा भारत दौरा पुढे ढकलण्यात आला आहे, या आमच्या विशेष वृत्तानंतर पंतप्रधान कार्यालयाने एक असामान्य निवेदन जारी केले आहे. हे विधान दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यावर आणि भेटीसाठी नवी तारीख निश्चित करण्यावर भर देते. भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी २० नोव्हेंबर रोजी इस्रायलमध्ये नेतान्याहू यांची भेट घेतली. या बैठकीनंतर, इस्रायली पंतप्रधानांनी २३ नोव्हेंबर रोजी 'एक्स'वर लिहिले, की आज मी गोयल यांची भेट घेतली. भारत आणि इस्रायल आपली धोरणात्मक भागीदारी मजबूत करत आहेत.

नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव त्यांचा भारत दौरा पुढे ढकलला का, या प्रश्नाचे उत्तर देताना सौदी अरेबियातील भारताचे माजी राजदूत तलमीज अहम म्हणतात, 'नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव दौरा पुढे ढकलणे भारतासाठी लज्जास्पद आहे. इस्रायली पंतप्रधानांनी आपला भारतातील सुरक्षेवर पूर्ण विश्वास आहे, असे स्पष्ट केले असले तरी नेतान्याहू सरकारकडून ब्रीफिंगशिवाय तिथल्या माध्यमांमध्ये इतका मोठा मुद्दा प्रकाशित झाला नसता.

आजघडीला नेतान्याहू हे घरी अनेक आघाड्यांवर वेढलेले आहेत आणि या वेळी भारताला भेट देणे त्यांच्यासाठी कठीण आहे. त्यांनी सत्य सांगायला हवे होते; परंतु कथित भेट पुढे ढकलण्याचे कारण म्हणून त्यांनी सुरक्षाविषयक चिंता पुढे केल्या आहेत. हे भारताचा अपमान करणारे आहे. भारत आणि इस्रायलमध्ये बरेच प्रतिकात्मक संबंध आहेत. असे असूनही, नेतान्याहू यांनी आपला दौरा पुढे ढकलून भारताला चांगला संदेश दिलेला नाही. अमेरिकेशिवाय कोणीही त्यांच्यासोबत उभे नव्हते, तेव्हा भारत त्यांना पाठिंबा देत होता. ट्रम्प यांच्या भारताप्रती बदललेल्या भूमिकेवरून इस्रायलमध्ये वाद सुरू झाला आहे. नेतान्याहू यांनी भारताचा दौरा पुढे ढकलण्याचे कारण म्हणून सुरक्षा चिंतांचा उल्लेख करणे तर्कसंगत नाही. नेतान्याहू भारताकडून खूप अपेक्षा करत आहेत, पण भारत एका मर्यादेपलीकडे जाऊ शकत नाही. नेतान्याहू यांना वाटते, की भारत कधी तरी पॅलेस्टिनींची बाजू घेतो, तर कधी तरी इस्रायलला पाठिंबा देतो. भारताने या विषयात मध्यस्थी करावी, असे इस्त्रायलला वाटत असले तरी भारत तसे करणार नाही. कारण त्याच्याही काही मर्यादा आहेत. त्यातच सध्या भारत आणि अमेरिकेचे संबंध चांगले नसल्याने ट्रम्प भारताची मध्यस्थी मान्य करणार नाहीत. याची भारताला जाणीव आहे. भारताला हे माहिती आहे, की कोणीही मध्यस्थी केली तरी ट्रम्प स्वतःच्या हितांशिवाय सहज काहीही घडू देणार नाहीत.

भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला, तर इस्रायलची प्रासंगिकता वाढते. कारण इस्रायल पाकिस्तानच्या अण्वस्त्रांना धोका मानतो. भारताचे अमेरिकेशी संबंध खराब असतील, तर इस्रायलशीही फारसे चांगले संबंध राहणार नाहीत. ट्रम्प यांनी भारतावरील कर पन्नास टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली, तेव्हा नेतान्याहू म्हणाले होते, की मोदी आणि ट्रम्प हे चांगले मित्र आहेत. ते मोदी यांना ट्रम्प यांच्याशी व्यवहार करण्यासाठी काही सूचना देतील; परंतु सार्वजनिकरित्या नाही.

नेतान्याहू यांनी भारतीय पत्रकारांच्या गटाला सांगितले, की भारत आणि अमेरिकादरम्यानच्या संबंधांमध्ये मूलभूत समजूतदारपणा आहे. दोन्ही देशांमधील संबंधांचा पाया खूप मजबूत आहे. दोन्ही देशांनी करार केला आणि करसमस्येचे निराकरण केले तर ते भारत आणि अमेरिकेच्या हिताचे असेल. हे आमच्यादेखील हिताचे असेल, कारण दोन्ही देश चांगले मित्र आहेत. नेतान्याहू यांनी या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेला भेट दिली होती. 'व्हाईट हाऊस'च्या एका सल्लागाराने युक्रेनवरील रशियाच्या क्रूर हल्ल्याला 'मोदी युद्ध' म्हटले आहे. ऊर्जेसाठी भारताचे रशियावर वाढत असलेले अवलंबित्व दुःखद आहे; परंतु पुतीन यांच्या युद्ध गुन्ह्यांसाठी भारत जबाबदार नाही, असेही त्यांनी म्हटले होते. माजी इस्रायली खासदार आणि मध्य पूर्व प्रकरणांच्या तज्ज्ञ केसेनिया स्वेतलोवा यांनी या वर्षी फेब्रुवारीमध्ये मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीपूर्वी 'जेरुसलेम पोस्ट' या वृत्तपत्रामध्ये 'इस्रायलने मोदी-ट्रम्प बैठकीची काळजी का घ्यावी' या शीर्षकाचा लेख लिहिला होता.

केसेनिया स्वेतलोवा यांनी लिहिले, की भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (आयएमईसी)साठी भारत आणि अमेरिकेतील चांगले संबंध महत्त्वाचे आहेत. मोदी पंतप्रधान झाल्यापासून भारताचे इस्रायलशी संबंध चांगले झाले आहेत. मोदी हे इस्रायलला भेट देणारे पहिले पंतप्रधान होते. भारत-पाकिस्तान संघर्षात जगातील जवळजवळ सर्व देशांनी तटस्थ राहण्याचा प्रयत्न केला, तेव्हा इस्रायलने भारताला उघडपणे पाठिंबा दिला. २००३ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात इस्रायली पंतप्रधानांची पहिली भारतभेट झाली होती. त्या वेळी एरियल शेरोन यांनी भारताला भेट दिली होती. भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला, की भारत आणि इस्रायलमधील संबंध अधिक मजबूत होतात, असे निरीक्षण अनेक विचारवंतांनी नोंदवले आहे. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे आणि अणुबॉंब मुस्लिम राष्ट्रांचा विरोधक म्हणून पाकिस्तान इस्त्रायलविरोधात वापरायला कमी करणार नाही, अशी भीती इस्त्रायलला वाटते. त्यामुळे या दोन देशांमध्ये तणाव होतो, तेव्हा इस्त्रायल-भारत संबंधांमध्ये सुधारणा होते. सध्या भारत आणि पाकिस्तानदरम्यानचे संबंध ताणलेले आहेत. अशा वेळी नेत्यानाहू यांनी दौरा रद्द करायला नको होता; परंतु ट्रम्प यांच्या दबावाखाली कदाचित नेत्यानाहू यांनी हा दौरा रद्द केला असावा.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

# बिबट्यापेक्षा अफवांचीच मोठी दहशत

वैष्णवी वाडकर

महाराष्ट्रात गेल्या दोन महिन्यांपासून बिबट्याच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याच्या दहशतीमुळे प्रत्येक गल्लीबोळात तसेच काना-कोपऱ्यात केवळ बिबट्याचीच चर्चा सुरू आहे. अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणात बिबटे कुठून आले, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. त्यामुळे राज्यात सध्या सुरू असलेल्या बिबट्याच्या गोंधळाला त्यांची वाढलेली संख्या कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. यादरम्यान, बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये अनेक नागरिक जखमी झाले असून काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे साहजिकच नागरिकांच्या मनात भीती घर करून बसली आहे. मात्र, बिबट्याच्या हालचालींपेक्षा वेगाने सध्या त्याच्याबाबतच्या अफवा पसरत असून त्यामुळे परिस्थिती अधिकच भयावह होत चालली आहे. त्यामुळे बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी कळकळीची मागणी नागरिकांकडून शासनाकडे केली जात आहे.

महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, नाशिक, उरण, बदलापूर यांसह अनेक जिल्ह्यांमध्ये बिबट्याने मानवी वस्तीत शिरकाव केल्याच्या घटना घडल्या आहेत. राज्यात सध्या अंदाजे १,९८५ बिबटे असल्याचे सांगितले जाते. आपण त्यांची जंगले तोडली म्हणून बिबट्या आपल्या घरात घुसत आहे, असे मत सध्या सर्वच व्यक्त करत आहेत आणि हे मत कुठे तरी खरेदेखील ठरत आहे. हळूहळू जंगले नष्ट होत गेली, जंगलात शिकारी होत होत्या, बिबट्याच्या भक्ष असलेल्या प्रजातींची शिकारी केली जात होती. त्याचबरोबर दुसरीकडे जंगले तोडून धरणे, बिल्डिंग व इतर बांधकामे होत राहिली. परिणामी बिबट्यांचा नैसर्गिक घरे नष्ट होत गेली आणि बिबट्याला मानवी वस्तीकडे वळावे लागले, असे मत तज्ज्ञ स्पष्ट करतात.

याचदरम्यान, मंगळवारी रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील नागावमध्ये बिबट्याने शिरकाव केला. त्यामुळे संपूर्ण अलिबाग तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. मंगळवारी रात्रीपर्यंत वनविभाग व पोलिसांकडून बिबट्याला पकडण्याचे प्रयत्न सुरु होते. बिबट्याला पकडण्यासाठी पुण्याहून रेसक्यू टीम पाचारण करण्यात आली होती. ठिकठिकाणी जाळे लावण्यात आले होते आणि अचानक बिबट्याने सुरक्षा भिंतीवरून उडी मारली. काही क्षणासाठी संपूर्ण परिसर हादरला. त्यानंतर २ दिवसांनी बिबट्याने आक्षी-साखरेकडे आपला मुक्काम वळवला. सकाळी ७ वा.च्या सुमारास बिबट्याने एका हॉटेलमध्ये घुसून तेथील एका कर्मचाऱ्यावर हल्ला केला. त्यामुळे गेल्या ४ दिवसांपासून संपूर्ण अलिबाग शहर भीतीच्या छायेत जीवन जगत आहे. बिबट्याला नेमके कधी जेरबंद केले जाणार, असा सवाल नागरिकांकडून सतत विचारला जात आहे. या संपूर्ण घटनेनंतर वनविभागाचा ढिसाळ कारभार समोर आला असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. अत्याधुनिक साधनांच्या अभावामुळे बिबट्याला पकडण्यात अपयश येत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

नागाव परिसर पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून डिसेंबर महिना हा येथील हॉटेल व्यावसायिकांसाठी महत्त्वाचा मानला जातो. मात्र, बिबट्याच्या शिरकावामुळे पर्यटक नागावला येतील की नाही, अशी चिंता स्थानिक व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. वनविभाग आणि रेस्क्यू टीमविरोधात नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. नागावसह इतर शहरात सुरु असलेल्या बिबट्याचा थराराने नागरिकांना घरातून बाहेर पाऊल टाकणे मुश्किलीचे केले आहे. ज्या ठिकाणी बिबट्याने शिरकाव केला तेथे सुरक्षेच्या दृष्टीने शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. मात्र, अनेक दिवस शाळा बंद असल्याने याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावर देखील होत आहे. एकंदरीत बिबट्याचा मुक्त संचाराने जनजीवन विष्काळीत होत आहे व सतत मनात भीती ठेऊन घराबाहेर पडावे लागत आहे. त्यातच बिबट्या बद्दलच्या वाढत्या अफवा नागरिकांच्या मनातील भीतीमध्ये अजून भर टाकत आहे. त्यामुळे बिबट्यापेक्षा अफवांची मोठी दहशत, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे.

दरम्यान, नागाव परिसरातील गावांमध्ये बिबट्या दिसल्याच्या अफवा पसरविणाऱ्या पोस्ट सोशल मीडियातून व्हायरल होत आहेत. चुकीचे फोटो आणि व्हिडिओ अपलोड केले जात आहेत. शुक्रवारी रात्री अलिबाग शहरातील डंपिंग ग्राउंड येथे बिबट्या दिसल्याचे व त्याने एका कुत्र्याला पकडला असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. या परिसरात वनविभागाने पाहणी केली. त्यांनतर हा व्हिडिओ अलिबागचा नसल्याचे समजले. तसेच, परिसरातील इतर गावांमध्येही बिबट्या पाहिल्याचा अफवा सातत्याने पसरत असल्याचे दिसून येते. एकूणच बिबट्याच्या घटनांइतकीच त्याबाबत पसरवली जाणारी चुकीची माहिती आणि अफवांमुळे नागरिकांच्या मनात अधिक भीती निर्माण होत आहे. त्यामुळे प्रशासनाने बिबट्याचा बंदोबस्तच करणे आहे. त्यामुळे नागरिकांनीही सोशल मीडियावरील पोस्टवर डोळे मिटून विश्वास न ठेवता जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. अन्यथा बिबट्यापेक्षा अफवांचीच दहशत नागरिकांना अधिक त्रस्त करत राहील.

---

लोकसंसद

## तरुणाईला नशेच्या गर्तेत नेणारा सनबर्न फेस्टिवल हवा कशाला ?

गेल्या काही दिवसांत वृत्तपत्र वाचताना राज्यात कुठेनाकुठे अमली पदार्थाचा साठा पकडल्याच्या बातम्या प्रतिदिन वाचनात येत आहेत. वाचून कोणाचेही डोळे पांढरे व्हावेत एव्हढे या अमली पदार्थांचे बाजारमूल्य असते. अर्थात जेव्हढे अमली पदार्थ पकडले जाते तेव्हढेच वृत्तपत्रांत छापून येते यापेक्षा कित्येक पटीने आज ते राज्यभर वितरित झाले आहे. ज्या राज्याची ओळख जगाच्या पाठीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र अशी करण्यात येते आज त्या महाराष्ट्राची ओळख देशातील सर्वात कर्जबाजारी राज्य, स्त्री अत्याचारात पहिल्या क्रमांकाचे राज्य अशी होऊ लागली आहे, गेल्या काही दिवसांतील बातम्या वाचल्यावर अमली पदार्थाचा सर्वात जास्त विळखा पडलेले राज्य म्हणून महाराष्ट्र आपली ओळख निर्माण करेल कि काय अशीही भीती आता वाटू लागली आहे. राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात २०१६ मध्ये सनबर्न फेस्टिव्हल झाला आणि पुण्यात विविध ठिकाणाहून अमली पदार्थाचा साठा पकडल्याच्या बातम्या वाचण्यात येऊ लागल्या. शालेय विद्यार्थीसुद्धा अमली पदार्थांच्या आहारी गेल्याचे गेल्या काही वर्षांत पुण्यात पाहायला मिळाले. विद्येचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या पुण्यात देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत असतात. या विद्यार्थ्यांनाच अमली पदार्थांचे रॅकेट चालवणाऱ्यांनी लक्ष्य केले. अमली पदार्थांचे रॅकेट चालवणाऱ्यांचे कनेक्शन थेट राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचले होते. संगीताच्या नावावर सनबर्न फेस्टिव्हलसारखे कार्यक्रम वर्षाच्या अखेरीस आयोजित केले जातात. भोगवादाला प्रोत्साहन देणारे हे पाश्च्यात्य कार्यक्रम तशाच प्रकारचे वातावरण तयार करतात. या वातावरणात झिंगण्यासाठी मद्यपानाची या ठिकाणी पुरेपूर रेलचेल असते सोबत अमली पदार्थ पुरवणारी माणसेही वावरत असतात जे आपले टार्गेट बरोबर हेरतात. या कार्यक्रमाला धनदांडग्यांचीच मुले अधिक येत असल्याने अमली पदार्थ विकत घेणे यांच्यासाठी विशेष बाब नसते. एकाच्या मदतीने दुसरा, दुसऱ्याच्या मदतीने तिसरा यांच्या गळाला लागतो आणि नशेच्या आहारी गेलेला तरुण पुढे यांच्याच इशाऱ्यावर नाचू लागतो. नशेखोरीला प्रोत्साहन देणारे आणि भोगवादाला खतपाणी घालणारे असे कार्यक्रम राज्यात हवेत तरी कशाला? केवळ कोट्यवधींचा महसूल मिळतो म्हणून महाराष्ट्र सरकारने आता राजधानी मुंबईत या फेस्टिव्हलला परवानगी दिली आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,** काळाचौकी, मुंबई

---

दिनविशेष

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

गुजरात राज्यातील करमसद नावाच्या छोट्या गावात जव्हेरीभाई पटेल आणि लाडाबाई या दांपत्याला एकूण पाच अपत्ये झाली. अशा या दाम्पत्याचा वल्लभ हा चौथा मुलगा ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी जन्माला आला. वल्लभ लहानपणापासून अतिशय हुशार, जिद्दी आणि मेहनती होता. १८९७ साली तो मॅट्रिकची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. पुढे तीन वर्षे अभ्यास करून डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा उत्तीर्ण झाला. कायद्याचा सखोल अभ्यास, वकिली धंद्याचे विशेष कौशल्य आणि खटला जिंकण्याची किमया यामुळे लवकरच वल्लभभाई नामवंत वकील म्हणून प्रसिद्ध झाले.

१९१० मध्ये विलयतेस जाऊन दीड वर्षे कायद्याचा अभ्यास करून त्यांनी बॅरिस्टरची पदवी मिळवली. १९१७ मध्ये वल्लभभाई लोकांच्या आग्रहास्तव अहमदाबाद नगरपालिकेचे सभासद म्हणून बिनविरोध निवडून आले. त्याचवेळी महात्मा गांधीजी गुजरातला आले होते. वल्लभभाईंची कीर्ती त्यांच्या कानावर गेली. गुजरात सभेचं प्रत्यक्ष कामकाज चालवण्यासाठी जाणता खंबीर आणि कणखर असा चिटणीस पाहिजे हा विचार करून गांधीजींनी त्या जागेवर बॅरिस्टर वल्लभभाईंची नेमणूक केली आणि येथूनच त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. इंग्रजी अधिकाऱ्यांच्या जुलमी वागणुकीला पायबंध घालण्याचं धाडस वल्लभभाईंच्या अंगी होतं. वेठबिगारीची अन्यायकारक पद्धत बंद करण्यास त्यांनी इंग्रज सरकारला भाग पाडले. तसेच कापड गिरण्यांमधील मजुरांची संघटना करून त्यांच्यावर होणारे अन्याय दूर केले. साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी इंग्रज सरकारला सहाय्य करण्यास भाग पाडले. बार्डोली तालुक्यात वल्लभभाईंच्या नेतृत्वाखाली साराबंदी चळवळ जोरात सुरू होती.

शेवटी सरकारला माघार घ्यावी लागली आणि त्यांनी वाढवलेला सारा कमी केला तसेच जप्त केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत केल्या. बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय झाला आणि म्हणून वल्लभभाईंचा गावोगाव गौरव करण्यात आला. लोकांनी त्यांना ङ्गसरदारफ ही पदवी दिली. वल्लभभाईंनी अहमदाबाद शहरात ६४ राष्ट्रीय शाळा काढल्या तसेच गुजरात विद्यापीठाची स्थापना केली.

झेंडा आंदोलन असेल किंवा कायदेभंगाची चळवळ असेल यामध्ये वल्लभभाईंनी पुढाकार घेतल्याने त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. १९३१ मध्ये कराची येथील कॉंग्रेस अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून सरदार वल्लभभाईंची सर्वानुमते निवड करण्यात आली. १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वतंत्र भारताचा झेंडा फडकला. पंडित जवाहरलाल नेहरू स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले तर सरदार वल्लभभाई उपपंतप्रधान झाले. त्यांच्याकडे गृह, माहिती आणि प्रसारण तसेच घटक राज्यांसंबंधीचे प्रश्न ही खाती सोपवण्यात आली. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतामध्ये सुमारे ६०० च्या वर संस्थाने होती. ही संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली नसती तर केवढ्या कटकटी उभ्या राहिल्या असत्या. अशा कठीण प्रसंगी वल्लभभाईंच्या पुढाकाराने व अथक प्रयत्नांनी सर्व संस्थाने भारतात विलीन झाली. ५०० होऊन अधिक संस्थांनाना एका घटनेखाली, एका ध्वजाखाली आणण्यात वल्लभभाई यशस्वी झाले म्हणून त्यांना ङ्गलोहपुरुष मअसे म्हणतात.भारताला गौरवशाली करण्याकरता वल्लभभाईंनी अनेक उपक्रम केले. जुनागड संस्थानातील सोमनाथचे मंदिर हे अनेक आक्रमणांनी भग्न झाले होते. १६ नोव्हेंबर १९४७ रोजी वल्लभभाईंनी या मंदिराला भेट दिली आणि त्याचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प जाहीर केला. त्यासाठी हजारो रुपयांच्या देणग्या मिळवल्या आणि मंदिराच्या जीर्णोद्धाराचे आश्वासन त्यांनी पूर्ण केले. हिंदुस्तानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी आजीव झुंज घेणारे, ङ्गमेरा भारत महानफ, असा महामंत्र जपणारे महापुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी १५ डिसेंबर १९५० रोजी मुंबई येथे निधन झाले. बार्डोलीचे सरदार, गुजरातचे सिंह, भारताचे लोहपुरुष, भारताच्या स्वातंत्र्यसमरातील सेनापती, भारताच्या एकतेचे शिल्पकार वल्लभभाई इहलोकांतून गेले. १९९१ मध्ये भारत सरकारने भारताचा सर्वोच्च सन्मान ङ्गभारतरत्नफ पुरस्कार देऊन वल्लभभाईंना सन्मानित केले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१५ डिसेंबर**

१) श्री. विश्वनाथ गोपाळ पाटील
चेंढरे, अलिबाग, १५-१२-१९४३
२) श्रीम. अपर्णा सुभाष कर्वे
चेंढरे, अलिबाग, १५-१२-१९५१
३) प्रज्ञा प्रविण राऊत
अलिबाग, १५-१२-१९६४

## राजाराम म्हात्रे यांचे निधन



**चिरनेर:** उरण तालुक्यातील चिरनेर राजाराम शिवराम म्हात्रे (८९) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुलं, सुना, नातजावई, नातवंडे, पंतवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

# मुरुडमध्ये शेकडो पर्यटक दाखल



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुका पर्यटन क्षेत्र असून येथील समुद्रकिनारे, ऐतिहासिक स्थळे आणि नैसर्गिक सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करत असतात. त्यामुळे पर्यटकांची पावले आपोआप मुरुड समुद्रकिनारी वळतात. विविध जिल्ह्यांतील पर्यटक शनिवार (दि.१३) सायंकाळपासून आपल्या वाहनांतून मुरुड समुद्रकिनारी दाखल झाले आहेत. त्यांनी येथील स्वच्छ निळ्याशार समुद्रात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला, तर काहींनी बनाना राईट्स, घोडागाडी व बाईकवर सवारी केली. त्याचवेळी किनाऱ्यावर क्रिकेट खेळण्याचा आनंदही पर्यटकांनी लुटला. त्यामुळे स्थानिक हॉटेल, टपरीधारक व लॉजींग व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

समुद्रकिनारा स्वच्छ सुंदर व सरळ असल्याने या ठिकाणी शेकोडोच्या संख्येने पर्यटकांनी गर्दी केलेली दिसुन येत आहे.

# पंचायत राज अभियान संपन्न



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान संबंध महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. नुकतेच सुधागड तालुक्यात देखील हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात सुधागड-पाली गटातून ग्रुप ग्रामपंचायत महागाव या ग्रामपंचायतीने सहभाग भाग घेतला. यावेळी अभियान कालावधीत ग्रामपंचायतीने केलेल्या उल्लेखनीय कामांचे व विविध उपक्रमाचे चित्रीकरण शासन स्तरावरून करण्यात आले. या अभियानात पाली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता मोहिते, सहाय्यक विकास अधिकारी अविनाश घरत, अशोक महामुनी, शासन प्रतिनिधी प्रदीप गोरे, मनेश महातो, पंचायत समितीचे धनंजय पाटील, विस्तार अधिकारी, सरपंच दीपिका सुतार, भास्कर पार्टे, महेश दानविले, नितीन भोसले, किसन गवारणे, रमेश जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते. तर, ग्रामपंचायत कर्मचारी सचिन शिर्के, ग्रामस्थ तसेच रवी कांबळे, भीमसेन पवार, राम पवार, स्वदेश फाऊंडेशनचे सहकारी किरण शिंदे, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, मदतनीस आदींनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बागायत जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणाऱ्या घर मिळकती, अशी संपूर्ण मिळकत श्री. अविनाश शांताराम राऊळ व सौ. प्रतिभ अविनाश राऊळ, रा. मुलुंड-मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार, सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. अविनाश शांताराम राऊळ व सौ. प्रतिभ अविनाश राऊळ, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, रस्त्याची वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकती पुर्णतः निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | २१४/१ | ००-१७-३०<br>००-०२-९० (पो.ख.)<br>००-२०-२० एकूण | ०७-९३ |

सदर बागायत जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडील घर क्रं. २५१२ व घर क्रं. २८९३ ह्या घर मिळकती.

सदर मिळकतीस चतुः सिमा -
पुर्वेस :- गट नं. २१४/२ ही बागायत जमिन मिळकत.
पश्चिमेस :- सार्वजनिक रस्ता.
दक्षिणेस :- गट नं. २३४ ही जमिन मिळकत.
उत्तरेस :- गट नं. २१० ही जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १४/१२/२०२५

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, फ्लॅट नं. २, अे विंग,
तळमजला टिळक रोड, अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# मंगेश जाधवांना कला भूषण पुरस्कार




**। महाड । प्रतिनिधी ।**

सम्यक कोकण कला संस्था (रजि.) महाराष्ट्र या संस्थेचा रौप्यमहोत्सवी २५ वा वर्धापनदिनी महाड तालुक्यातील खुटिल गावचे मंगेश जाधव यांना राज्यस्तरीय सम्यक कला भूषण या मानाच्या पुरस्काराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर या ठिकाणी साहित्यिक महेंद्र चाफे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सम्यक कोकण कला संस्था (रजि.) महाराष्ट्रचे अध्यक्ष मंदार कवाडे, प्रदिप खेत्रे, संतोष गमरे, शरद जाधव आदीं मान्यवरांची उपस्थिती या प्रसंगी होती. जाधव यांनी ग्रामीण भागातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत मुंबईत घेतले. त्यांना लहानपणा पासूनच गायन, कवी, लेखन अशा विविध कलेची आवड असल्यामुळे त्यांच्या कवितेतून सामाजिक, जनजागृती प्रबोधन अशा कवितेचा महत्त्वपूर्ण भाग झाला. जाधव हे बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ३८५ गोरेगाव अध्यक्ष, खुटिल ग्रामोत्कर्ष मंडळ मुंबई अध्यक्ष, सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत आहेत. त्यांच्या समाजसेवेची नोंद घेऊन याआधीही बहुजन हितवर्धक कला संस्था कोकण रत्न पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांना विविध सामाजिक संघटनांकडून गौरविण्यात आले आहे.

## गणपत शिर्के यांना देवाज्ञा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**



नागोठण्याजवळील पळस गावातील सामाजिक कार्यकर्ते गणपत लक्ष्मण शिर्के यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, तीन विवाहित मुली यांच्यासह मोठा परिवार आहे. शिर्के यांचे दशक्रिया विधी सोमवार (दि.१५) डिसेंबर रोजी पळस येथील श्री शंकर मंदिराजवळ तर उत्तरकार्य गुरुवार (दि. १८) डिसेंबर रोजी शिर्के यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कुटुंबियांकडून देण्यात आली.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# काव्यलेखन स्पर्धेचे बक्षिस वितरण

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे यांच्यावतीने ङमराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल केंद्र सरकार, राज्य सरकार आणि समितीचे आभारफ या विषयावर राष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी उपस्थित साहित्यिकांच्या आग्रहास्तव 'झेंडा' फेम गायक ज्ञानेश्वर मेश्राम यांनी 'जगण्याच्या पाया' आणि 'विठ्ठला कोणता हा झेंडा घेऊ हाती' ही अत्यंत लोकप्रिय गाणी सादर केली. त्यांच्या गायनाने सभागृहात उपस्थित रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. टाळ्यांच्या कडकडाटात संपूर्ण सभागृह सुरेल आनंदाने दुमदुमून गेले. यार्चेळी ज्येष्ठ साहित्यिक राजन लाखे आणि गायक ज्ञानेश्वर मेश्राम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते राष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेतील विजेत्या कवींना पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रशस्तिपत्रके आणि रोख रक्कम प्रदान करण्यात आली.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यानी मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली प्रमाणे :- मिळकतीचे वर्णन मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. पुरूषोत्तम जगन्नाथ गोडबोले | ७४ | ३ | १-५९-५०<br>पो.ख. ०-१६-४० | २-७४ |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.
दि. १५/१२/२०२५.

ॲड. निलेश रखमाजी पादीर
मो.- ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.९८५०७६७५६८

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** करंजाडी, आडवली आणि वैभववाडी येथे अभियांत्रिकी विभागासाठी पीवे स्टोअर्स बांधकाम, तसेच रत्नागिरी आणि कणकवली स्थानकांवर एस अँड टी स्टोअर्सचे बांधकाम. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-स्टोर-2025-39 दिनांक: 15/12/2025, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 47,54,660.03/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 22/12/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 05/01/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे, सहाण ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकती पैकी ०-४५-८० हे. आर क्षेत्र श्री. अशोक परशुराम पाटील वगैरे ७ रा. सहाण, ता. अलिबाग जि.रायगड यांच्या मालकीची असून, आमचे अशिल यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| सहाण, ता. अलिबाग जि.रायगड | ४०० | ०-४९-००<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकूण ०-५०-८० | ९.७३ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री. अशोक परशुराम पाटील वगैरे ७ यांचे मालकीचे क्षेत्र ०-४४-०० हे. आर पो.ख. ०-०१-८० आर्स एकूण क्षेत्र ०-४५-८० हे. आर जमिन मिळकत नोटीसीचा विषय आहे.

क्षेत्र ०-४५-८० हे. आर मिळकतीस चतु:सिमा खालील प्रमाणे
पुर्व - अंतर्गत रस्ता.
पश्चिम - गट नं. ३९६ ही जमिन मिळकत.
उत्तर - अलिबाग रोहा रस्ता.
दक्षिण - गट नं. ४०१ ही जमिन मिळकत.

सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १४/१२/२०२५
संपर्क:-
श्री. बाळासाहेब काशीद
मो. ९८५०४९९०९८
श्री. प्रसाद माणीकराव हवलदार
मो. ९८९०९७५५११

सही-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता.माणगांव, जि.रायगड. जाहीर निविदा नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.१२/१२/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील १५ वा वित्त आयोग/ग्रा.पं.फंड अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नांव | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम | इसारा फी | निविदा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यायामशाळा सुशोभिकरण करणे | ग्रा.पं. फंड | ५००००/- | ५००/- | २००/- | १८/१२/२०२५ | १९/१२/२०२५ | ३ महिने |
| २ | ग्रामपंचायत कार्यालय छप्प दुरूस्ती करणे | ग्रा.पं. फंड | १०००००/- | १०००/- | २००/- | १८/१२/२०२५ | १९/१२/२०२५ | ३ महिने |
| ३ | मौजे चांदेवाडी स्मशानभूमी चौथरा दुरूस्ती करणे | ग्रा.पं. फंड | ५००००/- | ५००/- | २००/- | १८/१२/२०२५ | १९/१२/२०२५ | ३ महिने |
| ४ | भाले येथे भालजाई मंदिराजवळ पाणीसुविधा करणे. | १५ वा वित्त आयोग/लोकवर्गणी | ५६८८०/- | ५६८/- | २००/- | १८/१२/२०२५ | १९/१२/२०२५ | ३ महिने |

अटी व शर्ती :- १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि.१८/१२/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा.उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध.) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**ग्रामसेवक**
ग्रुप ग्रामपंचायत भाले

सही/-
**सरपंच**
ग्रुप ग्रामपंचायत भाले

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. प्रविण गोविंद वाघमारे रा.डोनेवाडी, साळोख तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक १. श्रीमती पाली चंदर उघडा २. श्री. जैतु काशिनाथ पारधी ३. श्रीमती वनिता रमेश उघडा ४. श्रीमती संगिता संजय उघडा रा. वर्णे, ठाकुरवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुलाचीवाडी तालुका. कर्जत जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं (प्लॉट) | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी)शेती | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १७ | २/४ | ४-००-०० या पैकी लिहून देणार यांचा अविभक्त हिस्सा २-४०-०० | २.८० |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्भूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेहि प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी. मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे
दिनांक : १५/१२/२०२५

अशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा. युको बँक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५
## प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्धीची
## जाहीर सूचना

मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि. १३.११.२०२५ च्या सुधारीत वेळापत्रकानुसार पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या पनवेल विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिकाच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता तयार केलेली प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागविण्यासाठी दि. २०.११.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मा.राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ४१/का-५ दि. २६.११.२०२५ ने सुधारित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दि. ०३.१२.२०२५ होता. सदर दिनांकापर्यंत प्राप्त हरकती व सूचनाबाबत योग्य ती कार्यवाही पूर्ण करून पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रभाग क्र. १ ते २० च्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या सुधारीत कार्यक्रमानुसार नागरिकांच्या माहितीसाठी सोमवार दि. १५.१२.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून सदरच्या अंतिम मतदार याद्या खालील नमूद ठिकाणी मतदाराच्या व नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. पनवेल महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग)
२. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com)
३. महानगरपालिकेची सर्व प्रभाग कार्यालय व उपविभाग नावडे.

जा.क्र. :- पमपा/नि.वि./अं.म.या.प्र./२१२५/१८८/१०३/२०२५
दिनांक : १४/१२/२०२५

स्वाक्षरी/-
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. आशिष हरिश्चंद्र पाटील रा. रुम नं. ४०४, साईनिवास बिल्डींग, बांद्रा पुर्व, मुंबई-४०००५१ यांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. जगन्नाथ माया म्हात्रे रा. बोरी, पोस्ट-वडखळ, तालुका-पेण, जिल्हा रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन- जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा-बोर्वे, गुपग्रामपंचायत मसद, मौजे बोर्वे येथील जमिन गट नं. ४५ क्षेत्र १-०३-९० हे.आर.चौ.मी. आकार रु. ९-१२ पैसे पैकी श्री. जगन्नाथ माया म्हात्रे यांचे हिश्श्यापैकी ०-२०-० हे.आर. चौ.मी. त्यासी आकार रु. ३-७८ ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १० (दहा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-२०-० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. १५/१२/२०२५

**ॲड. संजय बी. पाटील**
बी.कॉम.एल.एल.बी.डी.पी.एम.
१६, परमार प्लाझा हायस्कूल
शिवाजी पेठ, पेण-रायगड

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल रामेश्वर नरवडे, रा. बी-१०१, मयूर पार्क, प्लॉट नं. १/२२, पोलीस स्टेशनसमोर, सेक्टर ३६, कामोठे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची शेतजमीन/प्लॉट मिळकत तिचे मालक रमाकांत तुकाराम साटम, रा. ४५, रुम नं. २०, डॉ. जी.एम. भोसले मार्ग, जांबोरी मैदानजवळ, वरळी, मुंबई, महाराष्ट्र, ४०००१८ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन/प्लॉट मिळकतीचे वर्णन:-**

मौजे - वंजारवाडी, तालुका कर्जत, जिल्हा - रायगड येथील कोकण कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्यादित, वंजारपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील प्लॉट मिळकत

| प्लॉट क्रमांक | ब्लॉक क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|
| जुना ६७४<br>नवीन १० | ए | ०.१३.५० |

वरील जमीन/प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : १५ डिसेंबर २०२५

**अधिवक्ता सुशांत बालाजी पुरी**
बी. एल. एस. एलएल. बी.
पत्ता : ५०२, पाचवा मजला, विंग ५ सी,
राधे गॅलेक्सी, भिसेगांव, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी ९०११६५३४६७

दि. १४-१२-२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरूड जि.रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुर्यकांत गजानन पाटील यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिल यांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| महाळुंगे बुद्रुक ता. मुरूड | २८/३ | ०-०५-०० | ०-२७ |
| महाळुंगे बुद्रुक ता. मुरूड | २८/२/१ | ०-१२-२०<br>पो.ख.०-०२-५०<br>एकूण ०-१५-०० | २-९१ |
| महाळुंगे बुद्रुक ता. मुरूड | ३५/१/१ | ०-१४-२०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-१५-०० | ०-१९ |

वर वर्णन केलेल्या मिळकती या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसाहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. १४/१२/२०२५

**ॲड. मोहनिष मनोहर ठाकुर**
रा.चिंचघर, पो.बोर्ली, ता.मुरूड, जि.रायगड
मो.नं. ८०८००१९११५

## निवडक



### डिजिटल तंत्रज्ञान विकास कार्यशाळा

**रसायनी :** रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे उत्पादन प्रणालींतील आधुनिक प्रवाह आणि डिजिटल तंत्रज्ञान या दोन आठवड्यांच्या प्रगत शिक्षक विकास कार्यशाळेचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले. १ डिसेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत आयोजित या कार्यशाळेत नामवंत तज्ज्ञ वक्त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. एस.एस. मंथा हे होते. त्यांनी डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग सिस्टम्सवरील आपले प्रभावी विचार मांडत इंडस्ट्री ४.० मधील बदलत्या प्रवाहांची दिशा स्पष्ट केली.



### शिर्की विद्यामंदिरात विज्ञान प्रदर्शन

**हमरापूर :** पेण तालुक्यातील शिर्की येथील हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटीच्या श्री धर्माशेठ नारायण पाटील माध्यमिक विद्यामंदिर शिर्कीचाळ या प्रशालेमध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे उपाध्यक्ष लिलानाथ पाटील यांनी भूषविले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वाशी केंद्रप्रमुख राजाराम म्हात्रे, दत्तात्रेय ठाकूर, कृष्णा भोईर, सर्व मुख्याध्यापक आणि विज्ञान शिक्षक, पालक वर्ग, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रशालेच मुख्याध्यापक श्री. चोरमले सर यांनी प्रास्ताविक केले. तसेच, सर्व परीक्षकांनी विज्ञान प्रतिकृती आणि रांगोळीचे परीक्षण केले. त्यानंतर आपल्या मनोगतात उपस्थित प्रमुख मान्यवरांनी शाळा राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. दुसऱ्या सत्रात निबंध, वक्तृत्व व प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केल्या. शेवटी सर्व स्पर्धाचे निकाल जाहीर करण्यात आले.



### विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील खाड्याचागाव येथील शालेय विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील पहिली ते चौथी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी वेगवगेळ्या संकल्पना प्रत्यक्षात आणून हे प्रदर्शन यशस्वी केले. दरम्यान, या प्रदर्शनाला शाळेच्यावतीने सर्व पालकांना निमंत्रण देण्यात आल्याने पालक वर्ग देखील आपल्या पाल्याचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता. शाळेचे शिक्षक देवेंद्र नाटिकार आणि मधुकर विषे यांच्या संकल्पनेतून हे विज्ञान प्रदर्शन भारावले. यावेळी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ठेवण्यात आलेल्या प्रतिकृतींचे परीक्षण करण्यासाठी यशवंत वेखंडे हे उपस्थित होते.



### विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**माणगाव :** तालुक्यातील रातवड विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव गुरुवारी (दि.११) मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडेला महत्त्व देत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख अतिथी अशोक धारिया, टी.टी.ई. प्रशांत शेटे, सरपंच वैशाली जाधव व उपसरपंच सतीश पवार यांच्या हस्ते झाले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या क्रीडा महोत्सवात सांघिक कबड्डी, खो-खो, क्रिकेट तसेच वैयक्तिक धावणे, बुद्धिबळ, फेकी, रिले आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शनिवारी (दि.१३) पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. ॲड. सुनील मोंडे, मुख्याध्यापक संतोष कदम व पालकवर्ग यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२
- HP गॅस हाशिवरे इथे कामासाठी मुलगा पाहिजे शिक्षण बी.कॉम ग्रॅज्युएट (इंग्रजी मिडीयम) काम अकाऊन्टंट २ वर्षी अनुभव असल्यास प्राधान्य संपर्क : ९७०२६७४५५५
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४
- भाडे तत्वावर किंवा चालवण्याकरीता १२०० स्वेकर फुट दोन बेडरूम ३०० फुट गॅलरी, सर्व फर्नीचर, गाड्या पार्कींगसह सर्व सोईयुक्त कॉटेज भाड्याने देणे आहे. संपर्क ८०१०६३४६५७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरणमध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट

**प्रशासनाच्या जाणिवपुर्वक दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण**

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील जसखार, सोनारी, करळ - सावरखार गावाजवळील रस्त्याच्या कडेला दुतर्फा जागेत गावगुंडांनी अवैधरित्या अनेक कंटेनर पार्किंग, गॅरेज, व ढाबे उभारले आहेत. जेएनपीए व पोलीस अशा शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आशिर्वादानेचे हे अवैध धंदे सुरू असल्याचे स्थानिक नारिकांकडून बोलले जात आहे. त्यामुळे येथील नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

उरणमधील जेएनपीए व शासकीय मालकीच्या सोनारीसह जसखार ग्रामपंचायतीच्या हद्दीत अनेक मोकळ्या जागा आहेत. या जागांवरील जासईपासुन जेएनपीए सेझ व करळच्या उड्डाणपुलाच्या खाली काही गावगुंडांनी कब्जा केला आहे. या ठिकाणी त्यांनी अवैधरित्या अनेक कंटेनर पार्किंग, गॅरेज व ढाबे उभारलेले आहेत. तसेच, त्यांच्याकडून वाहन चालकांना दमदाटी प्रसंगी शिवीगाळ व मारहाण करून जबरदस्तीने अवजड वाहने पार्किंग करण्याची सक्ती केली जात आहे. दादागिरीच्या जोरावर पार्किंगच्या नावाने दामदुप्पटीने पैसेही उकळले जात आहेत. त्याचबरोबर या अवैधरित्या उभारण्यात आलेल्या जागेतील ढाबे व कॅन्टीनमधुन राजरोसपणे दारु व अंमली पदार्थांची विक्री केली जात आहे. त्यामुळे अशी अवैध ठिकाणे समाजकंटक, माफिया व गुंडांचे अड्डे बनत चालले आहेत. तसेच, या ठिकाणी मोठी वाहतूक कोंडी होत असून अपघात देखील घडत आहेत. मात्र, याकडे जेएनपीए व पोलीस प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असून त्यांच्याकडूनच अवैध धंद्याना पाठबळ दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे हे अवैध धंदे अधिकच तेजीत आले असून काही विपरीत घटना घडण्याची भीती परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



#### जागा मोकळ्या करण्याच्या नोटीसा

जसखार, सोनारी, करळ-सावरखार ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जेएनपीएच्या मालकीच्या जागेत अवैधरित्या पार्किंग, गॅरेज व ढाबे उभारण्यात आले आहेत. याबाबत तक्रारीही जेएनपीएकडे दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे संबंधितांना जागा मोकळ्या कराव्यात यासाठी नोटिसाही बजाविण्यात आलेल्या आहेत. अशी माहिती जेएनपीए प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

> **उरण शहरासह जेएनपीए परिसर आणि न्हावा-शेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेकायदेशीर पार्किंग, ढाबे, कॅन्टीनमधुन चालणाऱ्या अवैध धंदे करणाऱ्यावर जेएनपीए प्रशासन व पोलिसांच्या मदतीने कारवाईची मोहीम कायम सुरुच असते.**
> – दिपक सुर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, न्हावा-शेवा बंदर पोलीस

## भटके श्वान नियंत्रण सभा



- **एसओपी पत्रकाचे सविस्तर वाचन करून माहिती दिली**
- **श्वान नियंत्रण कमिटी स्थापन करण्याच्या सविस्तर सूचना**

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

भटके श्वान नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड डॉ. सचिन देशपांडे यांच्या सूचनेनुसार पनवेल गटविकास अधिकारी समीर वाठारकर व सहाय्यक आयुक्त डॉ. समीर तोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवारी (दि.११) पनवेल पंचायत समिति येथे सभा घेण्यात आली होती. या सभेमध्ये भटके श्वान नियंत्रण कार्यक्रमात अंतर्गत सुप्रीम कोर्ट यांच्या आदेशाची, नगर विकास विभाग यांचे परिपत्रक, ग्रामविकास विभाग यांच्या परिपत्रक तसेच एडब्ल्यूबीआय मार्फत जारी झालेल्या एसओपी पत्रकाचे सविस्तर वाचन करून माहिती देण्यात आली. तसेच, ग्रामपंचायत पातळीवर भटके श्वान नियंत्रण कमिटी स्थापन करण्याच्या सविस्तर सूचना व मार्गदर्शनवरील सर्व परिपत्रकाचे वाचन करून डॉ. आनंद मारकवार पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती पनवेल यांनी सर्व उपस्थित ग्रामविकास अधिकारी यांना मार्गदर्शन केले. या सभेस मा. सहाय्यक गट विकास अधिकारी आर.बी. कोलटक्के, विस्तार अधिकारी संतोष ठोंबरे, महेश घबाडी व पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी सागर पाटील उपस्थित होते.

## खारपाटील विद्या संकुलनात वार्षिक स्नेहसंमेलन



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

चिरनेर येथील पी.डी. खारपाटील या विद्या संकुलनात वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विद्या संकुलनात शनिवारी (दि.१३) वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या विविध गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कला गुणांचे सादरीकरण करून उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये लावणीचा, कोळीगीतांचा आणि नृत्याचा जल्लोष रसिकांना अनुभवायला मिळाला. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पी.पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासन अधिकारी व्ही.ए. पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, कार्याध्यक्ष विजय पवार, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकांवृंद यांच्यासह कर्मचारी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पवार यांनी केले.

## प्रवासी वर्गासह वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर




● मुंब्रा महामार्गावर कलंबोली स्टील मार्केटसमोर रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाही पनवेल महानगरपालिकेचा बस स्टॉप उभारण्यात आला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रवासी वर्गासह वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे रस्त्याचे काम पूर्ण करूनच बस स्टॉप कार्यान्वित करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. (छायाचित्रः राजेश डांगळे)

## कैलासराजे घरत पुरस्काराने सन्मानित

**| रसायनी | प्रतिनिधी |**




सामाजिक कार्यकर्ते कैलासराजे घरत यांना स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे पत्रकारितेतील उत्कृष्ट योगदानाबद्दल 'कोकणरत्न पदवी' पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार प्रदान सोहळा मुंबई मराठी पत्रकार भवन येथे झाला. यावेळी स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत कोकणातील निवडक व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

स्वतंत्र कोकणराज्य अभियानातर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या 'कोकणरत्न' या मानाच्या पदवीसाठी यंदा उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड करण्यात आली. कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक प्रबोधनासाठी कार्यरत असलेल्या विविध मान्यवरांचा गौरव करणारा हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून यंदाच्या सोहळ्याला विशेष उत्साहाचे वातावरण लाभले. स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचा हा उपक्रम कोकणातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनकल्याणाच्या कार्यात योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा दिमाखात संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सचिन कळझुनकर यांच्यासह मुंबई अध्यक्ष धनंजय कुवेसकर, खजिनदार राजेंद्र सुर्वे, सुभाष राणे आणि सल्लागार दिलीप लाड या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. गेली अनेक वर्षे पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न धडाडीने मांडणारे खारपाडा गावचे पत्रकार कैलासराजे घरत यांना प्रतिष्ठेच्या 'कोंकणरत्न पदवी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकार कैलासराजे घरत यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांची पुरस्कारांची मालिका अखंडपणे सुरूच आहे.

## राजेंद्र वाचकवडे यांचे निधन

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

कोलाड येथील राजेंद्र रामचंद्र वाचकवडे यांचे वयाच्या ४२व्या



वर्षी निधन झाले. निधनाची बातमी समजताच कोलाड नाक्यावरील दुकान बंद ठेवण्यात आली. व्यापारी, शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईक, तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने अंतयात्रेस सहभागी झाले होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ, चुलते असा परिवार आहे. दशक्रिया विधी सोमवारी (दि.२२) कोलाड येथील नदीवर तर उत्तर कार्य बुधवारी (दि.२४) त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे ज्येष्ठ बंधू महेंद्र वाचकवडे यांनी सांगितले.

## शिवसंकल्पच्या नवीन कार्यकारिणीची निवड



**| उरण | प्रतिनिधी |**

शिवसंकल्प समालोचक असोसिएशनची वार्षिक सभा चिरनेर येथे नुकतीच पार पडली. १०वी नंतर शिक्षण घेण्यास असमर्थ असणाऱ्या गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक अर्थसहाय्य, गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत, शाळांना शैक्षणिक उपकरणे, अपंगांना व्हील चेअर, सायकल, शाळांना ब्लूटूथ स्पीकर असे सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या असोसिएशनची नवीन कार्यकारिणी निवड या सभेत करण्यात आली. यावेळी असो.च्या अध्यक्षपदी राजेंद्र भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच, उपाध्यक्षपदी हेमाली म्हात्रे तर सचिवपदी सुनिल वर्तक यांची फेर निवड करण्यात आली. त्याचबरोबर खजिनदारपदी पिंट्या घरत, मिडिया प्रमुख म्हणून विठ्ठल ममताबादे आणि सल्लागार म्हणून नितेश पंडित या सर्व पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली.

**मुंबई-गोवा महामार्गाची कामे युद्धपातळीवर | पावसाळ्यापर्यंत कामे पुर्ण करण्यावर भर**

# माणगाव-इंदापूर बायपासला गती

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव-इंदापूर बायपासच्या कामाला अखेर अपेक्षित गती मिळाली आहे. माणगावजवळील कळमजे ते मुगवली जोड रस्ता तसेच इंदापूर बायपास या दोन्ही ठिकाणी कामे युद्धपातळीवर सुरू असून, या मार्गावरील लहान-मोठ्या आठ पुलांची उभारणी एकाच वेळी केली जात आहे. सध्या ४००हून अधिक कामगार, अभियंते व तांत्रिक कर्मचारी दिवसरात्र काम करत असून, पावसाळ्यापूर्वी महत्त्वाची टप्प्याटप्प्याची कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.



#### नेमकी कोणती कामे सुरू?

सध्या बायपास मार्गावर आठ पुलांची उभारणी, सर्व्हिस रोडची कामे, बायपासचा मुख्य रस्ता, काँक्रीटीकरण, गडर बसविणे, मातीचा भराव, रस्ता मजबुतीकरण, ड्रेनेज व सुरक्षेसाठी आवश्यक संरचना अशी अनेक कामे समांतर सुरू आहेत. आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून दर्जेदार व टिकाऊ काम करण्यावर भर दिला जात आहे.

माणगाव-इंदापूर बायपासचे काम अनेक वर्षे रखडलेले होते. मागील ठेकेदाराने काम अत्यंत संथगतीने केल्याने ठेका रद्द करण्यात आला होता. त्यानंतर बराच काळ काम ठप्प राहिल्याने नागरिकांचा संयम सुटत चालला होता. व्यापारी, विद्यार्थी, प्रवासी आणि रुग्णवाहिका यांना वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसत होता. या पार्श्वभूमीवर माणगाव शहरातील नागरिकांना एकत्र येत आंदोलनाचा इशारा दिला होता. या आंदोलनाची दखल घेत खा. तटकरे यांनी केंद्र स्तरावर पाठपुरावा करत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन प्रकल्पातील अडथळ्यांची माहिती दिली. त्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचाली वेगाने घडल्या आणि काम पुन्हा सुरू झाले आहे.

पेण येथील मुख्य कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मे महिन्यापर्यंत बायपासची किमान एक मार्गिका पूर्ण करून वाहतुकीसाठी खुली करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे माणगाव व इंदापूर शहरातून जाणारी जड वाहतूक बायपासवर वळवता येणार असून, शहरातील वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि प्रवाशांचा वेळेचा अपव्यय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

## कुणबी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

कुणबी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म्हसळा यांच्या सन २०२६च्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा रविवारी (दि.१४) संस्थेच्या मुख्य कार्यालयात अध्यक्ष महादेव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष दिलीप मांडवकर, संचालक राजाराम तिलटकर, लहू तुरे, शंकर घोलप, महेश पवार, मीना टिंगरे, अर्पिता धोपटे, व्यवस्थापक प्रथमेश शिगवण, संजय गुलगुले, गीता गीजे, सुजाता पोटले, स्वप्नाली शिरवण, निलेश जाधव आणि मान्यवर उपस्थित होते.

# निवडक

## पोलादपूर तालुक्याचा पारा घसरला

**पोलादपूर** : पोलादपूरकरांना गेल्या दोन दिवसांपासून भरदिवसादेखील थंडीची लाट अनुभवण्यास मिळत आहे. शनिवारी (दि.१३) सकाळी सव्वासात वाजेपर्यंत बारा अंश सेल्सियस एवढे न्यूनतम तापमान नोंदले गेल्याने फेब्रुवारी २०१९मध्ये निर्माण झालेली थंडीची लाट यावर्षी डिसेंबर महिन्यातच अनुभवण्यास मिळत आहे. यंदा पावसाने नोव्हेंबर अखेरपर्यंत जोर कायम ठेवला होता. त्यातून बाहेर पडत असतानाच आता अचानक थंडीने कहर करण्यास सुरूवात केली आहे. ऑक्टोबर हिटचा यंदा काही दिवस तडाखा बसला तरी पावसाने संततधार कायम ठेवली होती. यादरम्यान, पोलादपूर तालुक्यात शनिवारी सकाळी सव्वासात वाजता पारा खुपच खाली उतरल्याचे ऍक्युव्हेदर या मोबाईल ऍप्लीकेशनवरून दिसून आले. सूर्योदय पावणेआठ वाजेपर्यंत लांबणीवर गेला असताना वातावरणात कडाक्याची थंडी जाणवून तापमान केवळ १२ अंश सेल्सियस एवढे घसरले. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हे तापमान ९ अंश सेल्सीयसपर्यंत होते, असे काही पोलादपूरकरांचे म्हणणे आहे. तसेच, धुके आणि गारव्यामुळे पोलादपूरकरांना दरवाजे खिडक्या बंद करून अंगात उष्णता निर्माण करणारे उबदार कपडे परिधान करून वावरावे लागत आहे. अनेकांनी रस्तोरस्ती शेकोट्या पेटवून थंडीवर मात करण्याची उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे.

## स्वातंत्र्यसैनिक भगत यांना अभिवादन

**नेरळ** : १९४२ चे स्वतंत्र लढ्यात सहभागी झालेले कर्जत तालुक्यातील अवसरे येथील क्रांतिकारक राघो नागो भगत तथा भगत मास्तर यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन केले आहे. भगत मास्तर यांना यावेळी अवसरे येथील समाधीजवळ कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्याकडून अभिवादन करण्यात आले. मार्गशीष वद्य एकादशी या दिवशी राघो नागो भगत यांचे निधन झाले होते.त्यांची पुण्यतिथी दरवर्षी भगत मास्तर प्रतिष्ठानच्या सभागृहात साजरी केली जाते.या प्रतिष्ठानचे अध्यक्ष भरत भगत यांच्याकडून दरवर्षी तीन दिवसांचा अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित केला जातो.या सोहळ्याला सुरुवात झाली असून १४ ते १६ डिसेंबर या कालावधीत हा सोहळा साजरा होत आहे.

## झाडे तोडून कचरा गटारात



**श्रीवर्धन** : श्रीवर्धन शहरातील करदमे मोहल्ला व प्रभू आळी नाक्याच्या कोपऱ्यावरच असलेल्या डॉ. कासीम युनुस राऊत चौकात एका जागा मालकाने विविध प्रकारची झाडे तोडून त्याच्या फांद्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या गटारात टाकून दिलेल्या आहेत. समोर बागवान मस्जिद असून त्याच्या वॉल कंपाउंडच्या बाजूला देखील फांद्या फेकून देण्यात आल्या आहेत. नगर परिषदेचे सफाई कर्मचारी त्या फांद्या उचलून नेतील या अपेक्षेनेच संबंधित जागा मालकाने हे कृत्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे स्वच्छ व सुंदर अशा श्रीवर्धन शहराला विद्रुपता येत आहे. या अगोदर देखील श्रीवर्धन नगर परिषदेला स्वच्छतेमध्ये चांगल्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. शहरात कोणत्याही ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत नाहीत किंबहुना गटारे तुंबलेली देखील पाहायला मिळत नाहीत. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने या जागा मालकाला नोटीस देऊन दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## रस्ता सुरक्षा जनजागृती शिबीर



**उरण** : उरण येथील नाईकनगर येथे शनिवारी (दि.१३) लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम आयसीआयसी लॉम्बर्ड आणि सेवा सहयोग फोऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या शिबिराअंतर्गत पालकांना व विद्यार्थ्यांना ३५० हेल्मेट भेट देण्यात आले. तसेच, रस्ते अपघात टाळण्यासाठी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व यावेळी उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. यावेळी पोलीस लाइन बॉइस संघटना अध्यक्ष गणेश पाटील, चाणजे सरपंच अजय म्हात्रे, विनय बर्वे, लायन्स क्लब ऑफ उरण अध्यक्ष साहेबराव ओहोळ, अंकन शाह, डॉ. नमिता मिश्रा, विजय गणात्रा, भूमिका सिंग, मोनिका चौकर, नम्रता पुंकर, राहुल भोईर, गोपाळ विटकर आदी उपस्थित होते.

## कांचन बुटाला यांना समाजभूषण



**पोलादपूर** : तालुक्यातील ज्येष्ठ समाजसेविका कांचन शरद बुटाला यांना माणगांव येथील 'कोकण फेस्टीवल'मध्ये समाजभूषण पुरस्कार २०२५ सिनेअभिनेत्री अलका कुबल आणि 'चला हवा येऊ द्या' फेमडॉ.निलेश साबळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

पोलादपूर तालुक्यात अंगणवाडया व बालवाड्यांची निर्मिती करून बालसंस्कारांसह महिलांना रोजगार निर्माण करणाऱ्या कांचन बुटाला यांनी घरेलू कामगार, महिला अत्याचार व कौटूंबिक हिंसाचार, विवाह समुपदेशन, दलित समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, विद्यार्थी वसतीगृह, महिला दक्षता समिती, पोलादपूर पंचायत समितीच्या प्रभारी सभापती, ज्येष्ठ नागरिक संघाची उभारणी स्थापना तसेच अध्यक्षपद या माध्यमातून वरिष्ठ नागरिकांसाठी सहली, विविध उपक्रम, अधिवेशनांचे आयोजन तसेच समाजसेवा करण्यासोबतच महिला तसेच ज्येष्ठांचे संघटन उभारणी केली. अगदी सुरूवातीच्या काळातच आर्थिक मागास तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कामाची दखल तत्कालीन समाजकल्याण मंत्री तसेच माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी घेऊन कांचनताई बुटाला यांची विशेष प्रशंसा केली होती. महिला विषयक तसेच सामाजिक कार्य आणि ज्येष्ठांप्रती केलेल्या कार्याबद्दल विविध संस्था आणि संघटनांनी कांचन बुटाला यांच्या कार्याचा विविध पुरस्कारांनी सन्मान केला आहे.

# भारत गॅस ग्राहकांची मोठी गैरसोय

## • नव्या नियमांमुळे स्वयंपाकावर संकट • जनजागृतीची जोरदार मागणी

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

भारत गॅसकडून अचानक लागू करण्यात आलेल्या नव्या नियमांमुळे रोहा शहरासह ग्रामीण भागातील हजारो सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. गॅस सिलेंडर संपल्यानंतर तात्काळ बुकिंग करूनही वेळेवर सिलेंडर न मिळाल्याने महिलांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. अनेक ठिकाणी सिलेंडरची गाडी दाराशी येऊनही, नव्या नियमांमुळे गृहिणींना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



भारत गॅसकडून अचानक नवे नियम लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे रोहा शहरासह ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे येथील नागरिकांच्या मोठ्या तक्रारी येत आहेत. त्यात गॅस कंपनीकडून कोणतीही पूर्वकल्पना किंवा अधिकृत सूचना देण्यात न येणे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांकडे पर्यायी स्वयंपाकाची साधने नसल्याने घराघरांत गॅस संपल्यामुळे गंभीर संकट निर्माण झाले असून काहींना चुलीचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे अनेक घरांमध्ये वेळेवर जेवण बनवणे कठीण झाल्याच्या तक्रारींत वाढ होत आहे. स्थानिक महिलांनी सांगितले की, कोणतीही पूर्वसूचना न देता भारत गॅसने नवे नियम लागू केले. बुकिंग केलेले असतानाही सिलेंडर परत नेण्यात येत असल्याने घरातील स्वयंपाकच ठप्प झाला आहे. यापूर्वी अशा अडचणी नव्हत्या; मात्र, अचानक बदललेल्या नियमांमुळे नागरिक पूर्णपणे गोंधळून गेले आहेत. या परिस्थितीचा फटका शाळकरी मुलांचे डबे, रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांचा स्वयंपाक तसेच दैनंदिन घरकामांवर बसत आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

दरम्यान, नियमांचे पालन आवश्यक असले तरी, अचानक नियम बदलांमुळे निर्माण झालेला गोंधळ लक्षात घेता, भारत गॅस कंपनीने तातडीने प्रभावी जनजागृती करावी. तसेच, ग्रामीण व गोरगरीब कुटुंबांच्या अडचणी लक्षात घेऊन तात्पुरत्या दिलासादायक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

### गॅसचे वितरकाचे स्पष्टीकरण

या संदर्भात भारत गॅसचे वितरक शकील अधिकारी यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, कंपनीच्या नव्या नियमानुसार ग्राहकाने जर महिन्याच्या १ तारखेला सिलेंडर घेतला असेल, तर पुढील बुकिंग किमान १५ दिवसांनंतरच करता येते. त्याआधी केलेले बुकिंग प्रणालीत स्वीकारले जात नाही. ग्राहकांच्या माहितीसाठी व्हॉट्सअॅप संदेश तसेच नव्या नियमांचे बॅनर लावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, सिलेंडर सुपूर्द करताना ग्राहकाच्या मोबाईलवर आलेला ओटीपी दिल्यानंतरच वितरण केले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आमची सेवा सुरळीत सुरू आहे, असा दावा त्यांनी केला. दरम्यान, ज्यांना डबल सिलेंडर कनेक्शन हवे आहे, त्यांनी तात्काळ कार्यालयात आवश्यक कागदपत्रे सादर करून ३ हजार २७० रुपये भरून दुसरा सिलेंडर घ्यावा, असे आवाहनही वितरकांकडून करण्यात आले आहे.

> “या संदर्भातील शासन निर्णय अद्याप अधिकृतरीत्या प्राप्त झालेला नाही. मात्र, चौकशीअंती गॅस वितरकांनी त्यांच्या प्रणालीमध्ये १५ दिवसांच्या आत सिलेंडर बुकिंग होत नसल्याची वस्तुस्थिती मान्य केली आहे. याबाबत लवकरच वितरकांना पत्र देऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच, नव्या नियमानुसार ग्राहकांना कशा पद्धतीने सुविधा मिळतील याचे नियोजन करण्यास सांगण्यात येईल.”
>
> – हेमलता कुरुसंधे, पुरवठा अधिकारी, तहसील रोहा

# जिल्हा परिषद शाळांतील परसबाग बहरल्या

**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये परसबागा बहरल्या असून, त्याचा थेट लाभ विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराला होत आहे. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेत राजीव गांधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाच्छापूरने प्रथम क्रमांक पटकावला, तर राजीव गांधी जिल्हा परिषद शाळा सागवाडीने द्वितीय आणि राजीव गांधी जिल्हा परिषद शाळा तिवरेने तृतीय क्रमांक मिळवला. या तीनही शाळांची जिल्हास्तरीय परसबाग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच सिद्धेश्वर, रासळ आदिवासीवाडी आणि भेलीवसावे येथील शाळांना गौरविण्यात आले.

तालुका स्तरावरून या परसबागांचे परीक्षण करण्यात आले. गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, विस्तार अधिकारी व पोषण अधीक्षक नवनाथ साबळे यांनी सर्व विजेत्या शाळांचे अभिनंदन केले. पेडली व नाडसूर केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे विशेष कौतुक करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. शाळांच्या परिसरात विकसित करण्यात आलेल्या या परसबागांमध्ये भेंडी, गवार, वांगी, पालक, दुधी, शिराळे, कारले, टोमॅटो तसेच विविध फळे व फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे. शिक्षक व विद्यार्थी मिळून या परसबागांची निगा राखत असून, येथील ताज्या व रसायनमुक्त भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनात केला जात आहे. त्यामुळे विद्यार्थी आवडीने व उत्साहाने भाजीपाला खात आहेत.

केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी सांगितले की, परसबागेमुळे विद्यार्थ्यांना ताजा व पौष्टिक भाजीपाला मिळतो. सेंद्रिय खतांचा वापर केल्याने भाज्या आरोग्यासाठी लाभदायक ठरतात. कमी खर्चात अधिक उत्पादन मिळते आणि विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयक आवड निर्माण होते. स्वतःच्या कष्टातून पिकवलेल्या अन्नाचे महत्त्व मुलांना उमगते.

# माथेरानच्या प्रवेशद्वारावरील लोगोमुळे पर्यटक आकर्षित

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपरिषद कडून आय लव्ह माथेरान असा सेल्फी पॉईंट बनविण्यात आला आहे. या सेल्फी पॉईंटचे ठिकाणी फोटो काढण्यासाठी पर्यटकांकडून गर्दी होत आहे.

माथेरान हे थंड हवेचे ठिकाणी वर्षभरातील चारही ऋतू मध्ये वेगवेगळा अनुभव पर्यटकांना देत असते.त्यामुळे उन्हाळा,पावसाळा आणि हिवाळा अशा तिन्ही ऋतुंमध्ये पर्यटक माथेरान येते असतात. ते लक्षात घेऊन माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कडून पर्यटकांचे लक्ष वेधण्यासाठी आय लव्ह माथेरान असे बोधचिन्ह असलेले सेल्फी पॉईंट विकसित केला आहे. त्या सेल्फी पॉईंटच्या ठिकाणी माथेरानमध्ये येणारा प्रत्येक पर्यटक फोटो काढण्यासाठी थांबत असल्याने हा सेल्फी पॉईंट पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. नगरपरिषदकडून असे सेल्फीपॉईंट उभारले जावेत अशी मागणी स्थानिकांनी केली आहे..

# सुवर्णकार व्यापारी व कारागिर संघटना पोलादपूर अध्यक्षपदी शेखर पालकर

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील सुवर्णकार व्यापारी आणि कारागिर यांनी गेल्या काही वर्षांपासून संघटना स्थापन करून विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. यावर्षी या संघटनेच्या अध्यक्षपदी शेखर सखाराम पालकर तथा बाळा पालकर यांची एकमताने निवड झाली आहे.

यावर्षी संघटनेच्या कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी दीपक पालकर, खजिनदारपदी वैभव केळकर, कार्याध्यक्षपदी प्रदीप पालकर, सल्लागारपदी संजय पालकर व सुभाष पालकर, सदस्यपदी अमोल सागवेकर, चंद्रकांत नगरकर आणि उमेश पालकर तसेच दीक्षा नगरकर यांची निवड करण्यात आली आहे.

आगामी काळात हॉलमार्क तसेच सोने चांदीच्या वाढत्या दरांमुळे व्यापारी व कारागिरांच्या समस्यांत वाढ झाल्यास ग्राहकांचे हित जपण्यासोबत संघटनेच्या कामामध्ये अधिक अभ्यासूपणे लक्ष देण्यासंदर्भात तसेच पूर्वीचे उपक्रम जोमाने राबविण्यासंदर्भात सर्वसहमतीने निर्णय घेण्याची ग्वाही यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष शेखर सखाराम पालकर तथा बाळा पालकर यांनी दिली.

# बँक ऑफ इंडिया आरसेटिचा उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

बँक ऑफ इंडिया आरसेटि रायगडद्वारा 'एक ग्रामपंचायत एक बँक सखी' या योजने अंतर्गत जिल्ह्यातील ३१ महिलांना अलिबाग येथे ६ दिवसीय बँकिंग प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकिंग अँण्ड फायनान्स या संस्थेमार्फत प्रशिक्षणार्थींची ऑनलाईन परीक्षा देखील घेण्यात आली. त्यामध्ये सर्व प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण झाल्या आहेत.



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनज्योती अभियान यंत्रणेद्वारा प्राप्त यादीनुसार स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांना ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड मार्फत हे मोफत प्रशिक्षण दिले जाते. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील वंचित असणाऱ्या लोकांना बीसी सखी मार्फत बँकेच्या आणि सरकारी योजनांचा लाभ पोहचवणे, स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांना बीसी सखी मार्फत बँकेच्या आणि सरकारी योजनांचा लाभ पोहचवणे, तसेच स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांना बीसी सखी म्हणून रोजगार उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ३१ महिला प्रशिक्षणार्थींना या योजने अंतर्गत प्रशिक्षणाचा लाभ मिळाला आहे. या प्रशिक्षणादरम्यान जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रायगडच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, शिरीष पाटील आणि सुजाता पाटील उपस्थित होते.

### जिल्ह्यातीली महिलांना बँकिंग प्रशिक्षण

यावेळी प्रियदर्शनी मोरे यांनी बँक सखींना 'वंचित समाज आणि बँक' यामधील महत्वाचा दुवा म्हणून बँक सखीची कार्यशैली कशी असावी आणि आपल्याला मिळालेले ज्ञान लोकोपयोगी कसे होईल, याविषयी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणच्या शेवटच्या दिवशी आरसेटि संचालक सुमितकुमार धानोरकर यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना येणाऱ्या संभावित अडचणी आणि त्यावर मात करण्याचे उपाय याविषयी मार्गदर्शन केले. तसेच, येत्या काळात अशाच प्रकारे प्रशिक्षण वर्ग आयोजित करून जिल्ह्यातील महिलांना लाभ मिळवून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत

**। तळा । प्रतिनिधी ।**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत सोनसडे, कलमशेत, कर्नाळा फळशेत, अडनाळे, भानंग अशा जवळपास अकरा गावांतील शेतकरी बांधवांसाठी फळबाग लागवड दिली गेली. या लागवडीमध्ये काजु, आंबा लागवड करण्यात आली असून तब्बल दिड वर्षे ऊलटुनही शेतकरी बांधवांच्या खात्यात एक रुपया आलेला नाही. त्यामुळे तळा तालुक्यातील शेतकरी बांधवामधून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.



येथील शेतकरी बांधवांनी खड्डे खोदणे, लागवड करणे, खत देणे, त्याचबरोबर पाणी व्यवस्थापन, कुंपन, आधार देणे अशी कितीतरी कामे केली आहेत. ही कामे अलिबागच्या मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत पाहिले जातात. परंतु, त्यांच्याकडून बिले का केली जात नाहीत, असा प्रश्न शेतकरी बांधवांमधून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने तालुक्यातील शेतकरी बांधवांना अनुदान देण्याची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी बांधवांच्यावतीने केली जात आहे.

## रा.शि.म्हात्रे यांचे निधन

**। उरण । प्रतिनिधी।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि नाट्य अभिनय, संगीत, काव्य व लेखन या सर्व आघाड्यांवर आपली नाममुद्रा उमटविणारे कलासक्त कलायात्री राजाराम शिवराम म्हात्रे (८९)यांचे वृद्धपकाळाने, चिरनेर येथील राहत्या घरात दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत शुक्रवारी १२ डिसेंबर रोजी नातेवाईकांसह, ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# डॉ.जाधव यांना सन्मानपदक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बाबू जगजीवन राम कला, संस्कृती तथा साहित्य अकादमीच्यावतीने दिला जाणारा देशातील प्रतिष्ठित 'महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक' यंदा डॉ. नंदकुमार जाधव यांना प्रदान करण्यात येणार आहे. राजधानी दिल्ली येथे लवकरच होणाऱ्या राष्ट्रीय सोहळ्यात हा गौरव समारंभ पार पडणार आहे.

डॉ. जाधव यांनी गेली अनेक वर्षे शैक्षणिक, सामाजिक आणि विशेषतः बौद्धिक अक्षम मुलांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत डॉ. नंदकुमार जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा अनेक मुलांचे आयुष्य घडविण्यासाठी सातत्याने काम करत आहे. शिक्षणासोबतच क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, स्वावलंबन प्रशिक्षण आणि समाजामध्ये जागृती निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. या उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन अकादमीने त्यांना सन्मान जाहीर केला आहे. विशेष मुलांच्या हक्कांसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्यामुळे सकारात्मक बदल घडत असल्याचे नमूद केले आहे.

## वनविभागाकडून प्रस्ताव मान्य | दिवसरात्र रस्त्याचे काम सुरु

# आदिवासी वाड्या जोडल्या जाणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात माथेरान डोंगरात असलेल्या १३ आदिवासी वाड्या आता रस्त्याने जोडल्या जाणार आहेत. या आदिवासी वाड्या वन जमिनीवर वसलेल्या असल्याने त्या ठिकाणी रस्ता बनवता येत नव्हता. मात्र, वन जमिनीचे प्रस्ताव मान्य झाल्याने आता या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून राष्ट्रीय ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडून या रस्त्यासाठी १५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. सध्या दिवसरात्र काम करून रस्त्याचे काम सुरु असून पनवेल कर्जत रेल्वे मार्गावर पुलाची निर्मिती झाल्याने तो प्रश्न निकाली निघाला आहे.



माथेरान डोंगरातील सर्व आदिवासी वाड्या १०० वर्षे आधीपासून अस्तित्वात आहेत. मात्र, वन कायदा अस्तित्वात आला आणि त्या ठिकाणच्या वाड्यांची जमीन वन विभागाच्या मालकीची झाली. त्यामुळे वन जमिनीवर वसलेल्या या आदिवासी वाड्यांमध्ये जाण्यासाठी पक्के रस्ते बनविले गेले नाही. मात्र, शासनाच्या ३/२ अंतर्गत प्रस्तावाच्या माध्यमातून जमीन देण्यात येऊ लागल्याने वन जमिनीतून रस्ते निर्माण होऊ लागले. दरम्यान, राष्ट्रीय रस्ते विकास यंत्रणेने माथेरान डोंगरातील रस्ता तयार करण्यासाठी १५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्या निधीमधून किरवली भागाकडून रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या १३ किलोमीटर मार्गात किरवली वाडी, आषाणेवाडी, सावरगाववाडी, बोरीचीवाडी, मना धनगर वाडा, धामणदांड, चिंचवाडी, सागाचीवाडी, आसलवाडी, नाण्याचा माळ, बेकरेवाडी, जुम्मापट्टी धनगरवाडी या वाड्या आहेत. सध्या आषाणे वाडी आणि सावरगाव वाडी मध्ये रस्त्यांची कामे सुरु असून तशाप्रकारे हे काम पुढे पुढे जाणार आहे.

### वाड्यांमध्ये आनंदाचे वातावरण

माथेरान डोंगरात १३ आदिवासी वाड्या असून त्या नेरळ-माथेरान घाटरस्त्यातील जुम्मापट्टी धनगरवाडापासून किरवली वाडीपर्यंत असलेल्या १३ किलोमीटर मार्गात वसल्या आहेत. अनेक पिढ्यांपासून आदिवासी आणि धनगर समाजाच्या लोकांची वस्ती येथे वास्तव्य करीत असून वन विभागाची दळी जमिनीवर या वाड्या वसल्या आहेत. वन विभाग रस्ता तयार करण्यासाठी जमीन देत नसल्याने येथील आदिवासी आपल्या रस्त्याचा प्रश्न स्वतः एकत्र येऊन श्रमदान करून सोडवत असत. दरम्यान, राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्यतीने या रस्त्याचे भूमिपूजन झाले होते. मात्र, त्याआधी आसल वाडीपर्यंत जाण्यासाठी नेरळ-माथेरान घाटरस्त्यातून जुम्मापट्टी येथून जावे लागत होते. आता वनविभागाने रस्त्यासाठी मंजुरी दिल्याने या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे येथील आदिवासी वाड्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# भारताला पराभवाची परतफेड करण्याची संधी

## ।। दोन्ही संघांसाठी सामना महत्त्वाचा ।। खेळपट्टी फलंदाज-गोलंदाजांना मदतगार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात सध्या ५ टी -२० सामन्यांच्या मालिकेचा थरार सुरु आहे. ही मालिका २ सामन्यांनंतर बरोबरीत आहे. तर तिसरा सामना रविवारी १४ डिसेंबरला खेळवण्यात आला आहे. हा सामना हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या धर्मशाला क्रिकेट स्टेडियममध्ये होणार आहे. दोन्ही संघांसाठी हा सामना महत्त्वाचा आहे. भारतीय संघाला हा सामना जिंकून मालिका विजयाचा दावा मजबूत करण्याची संधी आहे. त्यामुळे भारतीय संघ या सामन्यात कशी कामगिरी करते? याकडे क्रिकेट चाहत्यांचे बारीक लक्ष असणार आहे.**





भारतीय संघाने मालिकेत विजयी सुरुवात केल्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात गुडघे टेकले. दुसऱ्या सामन्यात भारताचे फलंदाज आणि गोलंदाज निष्प्रभ ठरले. त्यामुळे भारताला पराभूत व्हावे लागले. त्यामुळे भारतीय समोर पराभवानंतर तिसऱ्या सामन्यात कमबॅक करण्याचे आव्हान आहे. या मालिकेतील पहिल्या टी-२० सामन्यात शुभमन गिल अवघ्या ४ धावा करून बाद झाला होता, तर दुसऱ्या सामन्यात तो खातेही न उघडता शून्यावर तंबूत परतला. त्यामुळे पुढील सामन्यात त्याच्या जागी संजू सॅमसनला संधी मिळणार का, याबाबत चर्चा रंगू लागली आहे. आकडेवारी पाहिली तर गिलची टी-२० मधील अलीकडची कामगिरीही निराशाजनक आहे. मागील १४ टी-२० डावांत त्याने केवळ २६३ धावा केल्या असून त्यातील सर्वोच्च धावसंख्या फक्त ४७ इतकीच आहे.

धर्मशाळेची खेळपट्टी फलंदाज आणि गोलंदाज दोघांनाही मदत करते. मात्र, बाउंड्री लहान असल्याने फलंदाजांना फायदा होतो. त्यामुळे भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात येथे हाय स्कोरिंग सामना होण्याची शक्यता आहे. शिवाय, हा सामना सायंकाळी होणार असल्याने, त्यावेळी खेळाडूंना थंडीचा सामना करावा लागेल, जे दोन्ही संघांसाठी एक आव्हान असणार आहे.

धर्मशाळा क्रिकेट स्टेडियमने आतापर्यंत १० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने आयोजित केले आहेत. या सामन्यां दरम्यान, प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने चार सामने जिंकले आहेत, तर दुसऱ्या फलंदाजी करणाऱ्या संघाने चार सामने जिंकले आहेत.

दोन सामने अनिर्णित राहिले आहेत. या खेळपट्टीवर सरासरी धावसंख्या १५० आहे. या मैदानावर सर्वाधिक टी-२० धावसंख्या २००/३ आहे, जी दक्षिण आफ्रिकेने २ ऑक्टोबर २०१५ रोजी भारताविरुद्ध केली होती. भारतीय क्रिकेट संघाने धर्मशाला स्टेडियमवर तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, त्यापैकी दोन जिंकले आहेत.

# निवडक

## राष्ट्रीय नेमबाजीसाठी स्पर्धक रवाना

**सावंतवाडी :** ६८ वी राष्ट्रीय शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धा ११ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान भोपाळ व दिल्ली येथे आयोजित केली आहे. भोपाळ येथे रायफल प्रकारातील, तर दिल्ली येथे पिस्तूल प्रकारातील स्पर्धा घेण्यात येणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी जिल्ह्यातील १२ नेमबाज रवाना झाले. १० मीटर रायफल प्रकारात शिवम चव्हाण, गौरव आजगावकर, नीलराज सावंत, हंसिका गावडे हे चार नेमबाज एम.पी. स्टेट शूटिंग अकादमी भोपाळ येथील स्पर्धेत सहभागी होतील, तर अन्विता सावंत, राजकुमारी बगळे, अवनी भांगले, श्रीया नाखरे, समर्थ बगळे, अमेय जाधव, शैलेश सावंत यांची १० मीटर पिस्तूल प्रकारासाठी निवड झाली आहे. प्रतीक्षा सावंत ही २५ मीटर स्पोर्ट पिस्तूल प्रकारात सहभागी होणार आहे. ही स्पर्धा डॉ. कर्णी सिंग शूटिंग रेंज, तुघलकाबाद, नवी दिल्ली येथे आयोजित केली आहे. हे सर्व नेमबाज उपरकर शूटिंग अकादमी, सावंतवाडी व वेंगुर्ले येथे नेमबाजीचा सराव करत असून त्यांना प्रशिक्षक कांचन उपरकर व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विक्रम भांगले यांचे मार्गदर्शन आहे.

## नेमळे पंचक्रोशी प्रशालेचे यश

**सावंतवाडी :** पाटकर वर्दे कॉलेजतर्फे आयोजित विविध स्पर्धांमध्ये नेमळे पंचक्रोशी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.पाककला स्पर्धेत अनिशा मयेकर हिने प्रथम, सलील कुडाळकर याने तृतीय व सानिका राऊळ हिने उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. रील मेकिंग स्पर्धेत सार्थक राऊळ याने तृतीय, रांगोळी स्पर्धेत भार्गवी मांजरेकर हिने उत्तेजनार्थ, रील स्पर्धेत साहिल कुडाळकर याने तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष आ. भि. राऊळ, पदाधिकारी, प्राचार्य आर. के. राठोड, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. सर्व विद्यार्थ्यांना सुषमा कासार यांनी मार्गदर्शन केले.

## मॅरेथॉन स्पर्धेत साक्षी झळकली

**चिपळूण :** पुणे येथे आयोजित आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत चिपळूण तालुक्यातील कुडप येथील साक्षी जड्याळ या धावपटूने इथिओपियन धावपटूंना मागे टाकून संस्मरणीय यश मिळविले. साक्षी प्रथमच फुल्ल मॅरेथॉनमध्ये (४२.१९५ कि. मी.) सहभागी झाली होती. तिच्या या यशामुळे चिपळूण तालुक्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्पर्धेत झळकले आहे. पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन म्हटले की, आफ्रिकन धावपटूंचे वर्चस्व पाहायला मिळते. मात्र, महिलांच्या मॅरेथॉनमध्ये या वर्चस्वाला धक्का बसला आहे. साक्षीने इथिओपियन धावपटूंना मागे टाकून संस्मरणीय यश मिळविले. सणस क्रीडांगणापासून रविवारी पहाटे तीन वाजता मॅरेथॉनला प्रारंभ झाला. गेल्या वर्षी साक्षीने पुणे मॅरेथॉनमधील अर्धमॅरेथॉन जिंकली होती. यावेळी ती जिद्दीने ४२.१९५ किमी अंतराच्या शर्यतीत सहभागी झाली होती. यासाठी तिने गेल्या दोन-तीन महिन्यांपासून सातात्यात कसून सराव केला होता. या मेहनतीचे रविवारी चीज झाले. जिंकण्याच्या जिद्दीनेच साक्षी मॅरेथॉनसाठी आली होती; मात्र, आफ्रिकन धावपटूंचा सराव पाहून तिच्या मनात भीतीही होती.

## विनेश फोगाटच्या निवृत्तीवर पूर्णविराम

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिक गाजवणारी भारताची वाघीण मेहनती कुस्तीपटू विनेश फोगाटने आपले अधुरे ऑलिम्पिक स्वप्न पूर्ण आपल्या निवृत्तीच्या निर्णयावर पूर्णविराम लावला आहे. तिने आपल्या कुस्तीच्या आखाड्यातील पुनरागमनाची घोषणा सोशल मीडियावर एका भावुक पोस्टद्वारे केली. २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचूनही विनेशला पदक मिळाले नव्हते. वजन १०० ग्रॅम जास्त निघाल्याने ती अंतिम फेरीच्या काही तास आधीच स्पर्धेबाहेर झाली होती. या घटनेने ती मानसिकदृष्ट्या खचली आणि भावनेच्या भरात तडकाफडकी कुस्तीला रामराम ठोकला होता. त्यानंतर ती राजकारणाकडे वळली आणि आमदारही झाली. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये विनेश अंतिम फेरी गाठणारी पहिली भारतीय महिला पैलवान ठरली होती. तिच्या खेळात त्यावेळी असा आत्मविश्वास होता की, तिचे सुवर्णपदक जवळपास निश्चित मानले जात होते. पण तिच्या वजनात किरकोळ फरक निघाल्याने ती तत्काळ अपात्र ठरली आणि तिच्या स्वप्नांचा प्रवास अचानक संपला.



## मॅच फिक्सिंग प्रकरणी चार खेळाडू निलंबित

**नवी दिल्ली :** सैयद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेदरम्यान मॅच फिक्सिंगचे गंभीर आरोप झाल्यानंतर चार भारतीय खेळाडूंना निलंबित करण्यात आले आहे. आसाम क्रिकेट असोसिएशनने तातडीने कारवाई करत ईशान अहमद, अमन त्रिपाठी, अमित सक्सेना आणि अभिषेक ठाकूर यांना सस्पेंड केले आहे. या प्रकरणी गुवाहाटी क्राइम ब्रँचने एफआयआर दाखल केला असून, तपास पूर्ण होईपर्यंत या खेळाडूंना असोसिएशनतर्फे आयोजित कोणत्याही स्पर्धेत सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर भारतात मॅच फिक्सिंगसाठी नेमकी कायदेशीर शिक्षाकाय आहे, आणि अशा प्रकरणांत कोणती कलमे लावली जातात, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. मॅच फिक्सिंगसाठी स्वतंत्र कायदा नाहीभारतामध्ये मॅच फिक्सिंगसाठी स्वतंत्र असा कोणताही विशेष कायदा सध्या अस्तित्वात नाही. काही देशांनी यासाठी स्वतंत्र कायदे केले असले, तरी भारतात तपास यंत्रणांना फौजदारी कायद्यावरच अवलंबून राहावे लागते. भारतीय न्याय संहिते अंतर्गत पोलीस मॅच फिक्सिंग प्रकरणांत प्रामुख्याने फसवणुकीशी संबंधित तरतुदींचे कलम लावतात. मॅच फिक्सिंगमध्ये संघ, स्पर्धा आयोजक, प्रायोजक आणि प्रेक्षकांची फसवणूक होते, त्यामुळे हे कलम लावले जाते. याशिवाय, जर या प्रकरणात अनेक खेळाडू किंवा बाहेरील एजंट सामील असल्याचे आढळले, तर कलम ६१ देखील लावले जाऊ शकते. हे कलम गुन्हेगारी कटाशी संबंधित आहे. कारण मॅच फिक्सिंगच्या प्रकरणात सट्टेबाज, दलाल किंवा मध्यस्थांचा सहभाग असतो. भारतीय न्याय संहितेतील फसवणूक आणि गुन्हेगारी कटासारख्या कलमांखाली गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार आणि आर्थिक व्यवहारांच्या रकमेवर आधारित सात वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. मात्र, आजवरच्या प्रकरणांमध्ये मॅच फिक्सिंग प्रकरणांत दोष सिद्ध होणे कठीण आहे. यामागे ठोस पुराव्यांची कमतरता आणि स्वतंत्र कायदेशीर चौकटीचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत.

## रातवड वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडेला महत्त्व देत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवार दि. ११ डिसेंबर रोजी या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन अशोक धारिया, प्रशांत शेटे, वैशाली जाधव, सतीश पवार यांच्या उपस्थितीत झाले. उद्घाटनप्रसंगी संचलन, मानवंदना, क्रीडाध्वज फडकावणे, क्रीडाज्योत प्रज्वलन तसेच क्रीडा शपथविधी पार पडला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या क्रीडा महोत्सवात सांघिक कबड्डी,



खो-खो, क्रिकेट तसेच वैयक्तिक धावणे, बुद्धिबळ, फेकी, रिले आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. एकूण १३५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शनिवार (दि.१३) डिसेंबर रोजी आयोजित पारितोषिक वितरण समारंभात अ‍ॅड. सुनील मोंडे, संतोष कदम व पालकवर्ग यांच्याहस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व विजयी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्रे व शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. हा क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीकृष्ण गर्धे, अजित शेडगे, तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्तम नियोजन केले. अशोक धारिया, प्रशांत शेटे, डॉ. शिरीषकुमार पेंडसे, अ‍ॅड. सुनील मोंडे यांनी या स्पर्धेसाठी आर्थिक सहकार्य केले वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणचे अध्यक्ष डॉक्टर नंदकिशोर जोशी, डॉ. निलेश रेवगडे यांनी कौतुक केले.

## मुंबईचा हरियाणा विरुद्ध विजय

**मुंबई :** मुंबईने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये हरियाणाविरुद्ध धावांचा जबरदस्त पाठलाग केला. मुंबईने हरियाणाविरुद्ध २३५ धावांचे लक्ष्य अवघ्या १७.३ षटकात पूर्ण केले, जे स्पर्धेच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक यशस्वी धावांचे लक्ष्य आहे. जयस्वालच्या शतकामुळे निवडकर्त्यांचीही झोप उडली आहे. टी-२० क्रिकेटमधील सर्वात प्रतिभावान खेळाडूंपैकी एक असूनही, त्याला भारतीय संघात स्थान मिळालेले नाही. प्रथम फलंदाजी करताना हरियाणाने निर्धारित २० षटकांत ३ गडी गमावून २३४ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना यशस्वी जयस्वालने केवळ ४८ चेंडूत शतक झळकावले.

## उन्नती-इशरानी अंतिम फेरीत

**। कटक । वृत्तसंस्था ।**

ओडिशा मास्टर्स सुपर १०० ही बॅडमिंटन स्पर्धा कटक येथे सुरू आहे. १८ वर्षीय उन्नती हुडा हिच्यासमोर उपांत्य फेरीच्या लढतीत माजी ज्युनियर पहिल्या क्रमांकाची खेळाडू तस्नीम मिर हिचे आव्हान होते. तस्नीम मिर हिने पहिला गेम २१-१८ असा आपल्या नावावर केला, मात्र पुढील दोन गेममध्ये उन्नती हुडाने अव्वल दर्जाची कामगिरी करीत झोकात पुनरागमन केले. उन्नती हुडा हिने दुसरा गेम २१-१६ असा आपल्या नावावर केला. त्यानंतर पुढील गेममध्येही २१-१६ असेच यश मिळवले. उन्नती हुडा हिने एक तासामध्ये प्रतिस्पर्धी खेळाडूला हरवण्याची किमया करून दाखवली. आसामची बरुआ व तान्या हेमंत यांच्यामध्ये महिला एकेरीतील अन्य उपांत्य फेरीचा सामना रंगला.



पहिल्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये कमालीची चुरस पाहायला मिळाली. तान्या हेमंत हिने पहिला गेम २१-१८ असा जिंकत १-० अशी आघाडी मिळवली. इशरानी बरुआ हिने पुढील दोन गेममध्ये अनुक्रमे २१-७, २१-७ असे यश मिळवत विजयही साकारला. इशरानी बरुआ हिने ५४ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. पुरुष एकेरीत आगेकूचमहिला एकेरीप्रमाणे पुरुष एकेरीतही भारतीय खेळाडूने दमदार कामगिरी केली. किरण जॉर्ज याने उपांत्य फेरीच्या लढतीत रौनक चौहान याच्यावर तीन गेममध्ये विजय साकारला.

## मयंकने पुन्हा रचला नवा विक्रम




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणचा १२ वर्षीय मयंक म्हात्रे याने भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे २४ किमी सागरी अंतर पोहुन पार करत नवा विक्रम स्थापित केला आहे. मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. या आधी त्याने धरमतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे सागरी प्रवाह पोहून पार केले आहेत. तर त्याने पोहून पार केलेले तिन्ही प्रवाह प्रथम पोहून पार करण्याची नोंद मयंकच्या नावावर झाली आहे.

उरण सेंटमेरीज कॉन्व्हेन्ट स्कुलमध्ये इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या मयंकने नवा विक्रम स्थापित केला आहे. भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे २४ किमी सागरी अंतर त्याने ७ तास २१ मिनिटे ६ सेकंद या वेळेत पार करून आपल्या विक्रमची नवी नोंद केली आहे.

मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. महत्वाचे म्हणजे मयंकने याआधी धरमतर ते करंजा जेट्टी हे १८ किमी अंतर पोहून पार केले. हा प्रवाह पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू होता. तर घारापुरी ते करंजा जेट्टी हे १८ कमी अंतर पोहून पार करणारा देखील तो पहिला जलतरणपटू ठरला.

सलग तीन वर्षे मयंकने तीन समुद्रीय प्रवाह पोहून ओर केल्याने तो या तीनही प्रवाह पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे.

## आयुषचा हॅन्डशेक करण्यास नकार



**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये आज आशिया कप अंडर १९ चा सामना सुरु आहे. या सामन्यामध्ये भारताच्या कर्णधाराने हॅन्डशेक केला नाही. हॅन्डशेक न केल्यामुळे सध्या सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. आशिया कप २०२५ सप्टेंबरमध्ये पार पडला, यंदा झालेल्या आशिया कपमध्ये भारताच्या संघाने बाजी मारली होती. आशिया कप २०२५ दरम्यान, भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानी कर्णधार सलमान अली आघाशी हॅन्डशेक केला नाही. भारताच्या अंडर-१९ संघानेही ही पद्धत सुरू ठेवली आहे. रविवारी टॉस दरम्यान आयुषने पाकिस्तानचा कर्णधार फरहान युसूफशी हस्तांदोलन केले नाही.

## रायगडचा कैडेंस क्रिकेट अकॅडमीवर विजय

### ऋणालचे ७ बळी,आरवचे अर्धशतक

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रक्रिकेटअसोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या निमंत्रित आंतरजिल्हा चौदा वर्षाखालील मुलांच्या दोनदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने महाराष्ट्रातील सर्वात नामांकित व बलाढ्य क्रिकेट अकॅडमी म्हणून ओळख असलेल्या कैडेंस क्रिकेट अकॅडमी, पुणे संघावर वर पहिल्या डावाच्या आघाडीवर दणदणीत विजय मिळवत इतिहास रचला आहे.रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या चौदा वर्षाखालील मुलांच्या संघाने साखळी फेरीत चमकदार कामगिरी करत सुपर लिगच्या सामन्यांसाठी पात्रता मिळवल्याच्या नंतर सुपर लिग मध्ये सुद्धा दमदार कामगिरी सुरू ठेवली असून, काल पुणे,चांदखेड येथील थर्टीयार्ड क्रिकेट मैदानावर रायगड विरुद्ध कैडेंस क्रिकेट अकॅडमी ह्या संघामध्ये सुपर लिग फेरीतील सामना झाला त्यामध्ये प्रथम फलंदाजीला करतांना कैडेंस क्रिकेट अकॅडमी संघाला रायगडच्या



गोलंदाजी पुढे हात टेकावे लागले, रायगडचा अष्टपैलू खेळाडू व जलदगती गोलंदाज ऋणाल गिजे यांनी कैडेंसच्या ७ फलंदाजांना बाद करत संघाचा डाव अवघ्या १२२ धावांवर रोखला.रायगडच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद २०९ धावसंख्या उभारली त्यामध्ये रायगडच्या संघाचा सलामीवीर तंत्रशुद्ध फलंदाज आरव बरळ यांनी ५२ धावांची अर्धशतकीय खेळी करत संघाला पहिल्या डावाची आघाडी मिळवून दिली त्याला दुसऱ्या बाजूने कर्णधार देव सिंह यांनी मूल्यवान ३७ धावा काढून साथ दिली.रायगडच्या संघाने पहिल्या डावात ८७ धावांची भक्कम आघाडी घेत सामन्यावर पकड घेतली.दुसऱ्या डावात कैडेंसच्या संघाने संयमी फलंदाजी करत २ गडी बाद २२४ धावा केल्या त्यामध्ये विरेंन अटोळे यांनी ११५ धावा काढून शतक झळकले तर भाव्यराजे भोसले यांनी नाबाद ५२ धावांची खेळी केली.

२२४ धावांवर डाव घोषित केल्या नंतर रायगडच्या संघासमोर जिंकण्यासाठी १३७ धावांचे लक्ष ठेवले होते दुसऱ्या दिवसा खेळ संपला तेव्हा रायगडचा डाव ४ गडी बाद ५६ धावांवर रोखण्यात आला. सामना अनिर्णित राहिला असला तरी रायगडच्या संघाने पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळवला आहे. संघाच्या दमदार कामगिरी बद्दल जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांनी संघातील सर्व खेळाडूंना तसेच प्रशिक्षक सागर कांबळे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### हिमालयीन एक्स्ट्रीम ट्रायथलॉनमध्ये रचला विक्रम | १७ ते १८ अंश तापमाना लढवली खिंड

# आकाशची वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी निवड

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

चिपळूण तालुक्यातील खेर्डी येथील आकाश लकेश्री यांनी अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या हिमालयीन एक्स्ट्रीम ट्रायथलॉन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून चिपळूणचे नाव उंचावले आहे. एकूण आठ तास बावन्न मिनिटांत ही आव्हानात्मक स्पर्धा पूर्ण करत त्यांनी पुढील वर्षी होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळवली आहे. देशातील फार थोडे खेळाडू एवढ्या कठीण स्पर्धेत उतरतात, त्यात आकाश यांनी मिळवलेले यश उल्लेखनीय मानले जात आहे.



हिमालयीन एक्स्ट्रीम ट्रायथलॉन ही जगातील सर्वाधिक अवघड स्पर्धांपैकी एक मानली जाते. या स्पर्धेत पोहणे, सायकलिंग व धावणे या तीन टप्प्यांचा समावेश असतो. प्रचंड थंड वातावरण, खडतर पर्वतीय मार्ग, कमी ऑक्सिजन आणि तीव्र चढ-उतार यांच्या पार्श्वभूमीवर खेळाडूंना आपली शारीरिक व मानसिक क्षमता सिद्ध करावी लागते. या स्पर्धेत आकाश लकेश्री यांनी पोहण्याच्या २.८ किलोमीटर अंतरासाठी १७ ते १८ अंश तापमानाच्या थंड पाण्यात अवघ्या ५३ मिनिटांचा वेळ घेतला. त्यानंतरच्या ८८ किलोमीटर सायकलिंग टप्प्यात २४०० मीटर चढाचा सामना करत चार तास २७ मिनिटांत त्यांनी हा टप्पा पूर्ण केला. शेवटचा आणि सर्वात कठीण मानला जाणारा २१ किलोमीटर धावण्याचा टप्पा १७०० मीटर चढासह तीन तास २१ मिनिटांत पूर्ण करत त्यांनी एकूण आठ तास ५२ मिनिटांत स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली.

आकाश लकेश्री हे मूळचे खेर्डी येथील असून सध्या ते पुण्यात वास्तव्यास आहेत. २०१८ साली त्यांनी स्पोर्ट्स मॅनेजमेंटमधून एमबीए सुरू केले होते; मात्र फी भरण्यासाठी निधीअभावी त्यांनी शिक्षण अर्धवट सोडावे लागले. याच काळात त्यांनी ट्रायथलॉन हा खेळ निवडत आयुष्याला नवे वळण दिले.

पुण्यातील दोन प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रशिक्षणास प्रारंभ केला. स्पोर्ट्स मॅनेजमेंट संस्थेत काम करताना त्यांचा सचिन तेंडुलकर यांच्यासह अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या संपर्कात येण्याचा योग आला. त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा घेत २०१८पासून त्यांनी व्यावसायिक प्रशिक्षणाला गती दिली.

२०२० मध्ये दुबईमध्ये स्थानिकांच्या मदतीने त्यांनी पहिली मोठी ट्रायथलॉन स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. लॉकडाऊनच्या काळात ते चिपळूणमध्ये परतले आणि २०२१मध्ये रत्नागिरी येथे कोचिंग सुरू केले. त्यानंतर २०२२-२३ मध्ये पुन्हा पुण्यात स्थलांतर करून त्यांनी क्रीडा प्रशिक्षण सुरू ठेवले. २०२४ मध्ये त्यांनी 'स्काय एंडुरन्स क्लब' या नावाने स्वतःचे कोचिंग सेंटर सुरू केले.

आर्थिक पाठबळ नसतानाही त्यांनी स्वतःच्या मेहनतीतून नेपाळमध्ये झालेल्या एक्स्ट्रीम ट्रायथलॉन स्पर्धेत सहभाग नोंदवला आणि ही स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण करून या स्पर्धेत भाग घेणारे भारतातील पहिला खेळाडू ठरला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)